नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

वर्ष २३ अंक : सहावा

आक्टोबर १९६८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
डुंभळ ग्रंथ संपदा

वर्ष २३) आक्टोबर १९६८ (अंक ६

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेखे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
घंतोली, नागपूर-१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ	
१३०	श्रद्धांजली
१३१	विंदा करंदीकरांची तालचित्रे वामन इंगळे
१३४	अर्वाचीन तेलगु साहित्य डॉ. पो. सु. शास्त्री
१३७	नावात काय आहे प्रा. सौ. उषा लिमये
१३९	रुद्रवर्षा प्रभाकर पुराणिक
१४१	म. बसवेश्वर प्रधानमंत्री होते काय ? सुधाकर मोगलेवार
१४४	दासी 'जनी'चे एक दर्शन डॉ. शारदा मो. देशमुख
१४८	पुस्तक परीक्षणे भवभूति : डॉ. शं. बा. पेंडसे देवाचा शब्द : श्रीधर शनवारे
१५६	ग्रंथपरिचय चंद्रकांत कुळकर्णी
१	संघवार्ता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भकेसरी ब्रिजलालजी बियाणी व श्री. बाबासाहेब खापर्डे यांना श्रद्धांजली

'युगवाणी'चा हा अंक तयार झाल्यावर विदर्भाचे दोन जेष्ठ नेते श्री. ब्रिजलालजी बियाणी व श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे निधन झाल्याच्या दुःखद वार्ता प्रसिद्ध झाल्या.

विदर्भकेसरी ब्रिजलालजी बियाणी यांचे मुख्य कार्य राजकीय क्षेत्रात असले तरी साहित्याच्या क्षेत्रातही त्यांची कामगिरी मोलाची होती. ते स्वतः हिंदीचे प्रथितयश लेखक होते व हिंदी व मराठी साहित्य संस्थावरही त्यांचा अतिशय लोभ होता. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यात त्यांची सतत बहुमोल मदत होत असे. अकोला येथे झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते व त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली संमेलनाची सर्व व्यवस्था अत्यंत संस्मरणीय होती. 'मातृभूमी' हे मराठी द्विसाप्ताहिक त्यांनी स्थापन केले व नंतर त्याचे दैनिकांत रूपान्तर करून त्या पत्राला स्थायी स्वरूप प्राप्त करून दिले.

श्री. ब्रिजलालजी बियाणी यांच्या निधनाने विदर्भातील गेल्या पिढीचा एक पहिल्या श्रेणीचा नेता नाहीसा झाला असून विदर्भाच्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची फार मोठी हानी झाली आहे.

श्री. बाळकृष्ण गणेश उपाख्य बाबासाहेब खापर्डे यांचेही विदर्भाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात फार मोठे स्थान होते. एक थोर लेखक, पट्टीचे वक्ते व विचारवंत म्हणून ते सर्वांना परिचित होते. विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेपासून त्यांचा संघाशी घनिष्ट संबंध होता व १९५४-५५ साली ते संघाचे अध्यक्ष होते. नागपूर येथे भरलेल्या वि. सा. संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य एका ज्येष्ठ साहित्यिकाला अंतरले असून विदर्भाच्या सामाजिक जीवनातील जुन्या पिढीचा एक ज्येष्ठ प्रतिनिधी आपल्यातून निघून गेला आहे.

श्री. ब्रिजलालजी बियाणी व श्री. बाबासाहेब खापर्डे या दोन्ही ज्येष्ठ नेत्यांच्या स्मृतीला आम्ही आदराने अभिवादन करतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विंदा करंदीकरांची तालचित्रे

वामन इंगळे

काव्यांतर्गत विचारसूत्र विचाराच्याच सोयीसाठी अलग काढतो म्हटले तर अनिल, कुसुमाग्रज, बोरकर, मर्ढेकर, बापट, पाडगावकर (दिलीप चित्रे, वसंत आबाजी डहाके; केचे, म. म., आरती प्रभु सतीश काळसेकर, केशव मेश्राम, ग्रेस, नारायण सुर्वे, सिराप, आदि नामावळीही यात येणे शक्य आहे.) आणि रेगे मुक्तिबोध यांच्या समग्र कवितेचा अभ्यास करून— या सर्वांच्या विचारसाधर्म्यातून साधलेला एक तर्कमान्य विकासक्रम दाखवून देता येणे अगदीच अशक्य नाही. (फक्त दिलीप चित्रे, अरुण कोल्हटकर, रेगे, आदींच्या काव्यातून एकच विचारसूत्र दाखविताना अपवाद करावा लागेल.) परंतु तरीही प्रत्यक्ष काव्याचा विचार करताना मात्र प्रत्येकाच्या काव्याची मूल्यनिर्णायक प्रतवारी ठरविताना ऐतिहासिकतेच्या ईषद् आधारासह— काव्यांतर्गत विचार किती जोरकसपणे व्यक्त झाला आहे याच कसोटीवर ठरवावी लागणार आहे. विचारसाधर्म्याच्या दृष्टीने मर्ढेकर, मुक्तिबोध आणि बापट हे त्या जुन्या बंडवाल्यांचे बादशहा शोभतील यात शंकाच नाही. करंदीकरांच्या समग्र काव्यातली बंडखोरीही नेमकी एवढ्याच ताकदीची आणि मोलाची आहे हे खरे. परंतु त्यांच्या इतर काही प्रयोगक्षम रचनांनी या बंडखोरीच्या उंचीला तेवढ्याच आवाक्याची रुंदीही प्राप्त करून दिली आहे. आणि म्हणूनच पु. शि. रेगे किंवा दिलीप चित्रे यांच्या काव्याला जे एक समाजस्थ वास्तवाबाहेरीलच्या अंतर्भागातील एक नवे परिमाण प्राप्त झाले आहे तीच कमाई एरव्ही अस्वस्थ तरी समाजवास्तवाला धीटपणे सामोरे जाणाऱ्या करंदीकरांच्या काव्याला लाभली आहे- त्यांची मुक्त सुनीतं ' ही प्रयोगक्षम निर्मिती अनेक रूपकल्पनांच्या आणि जीवनविषयक संदर्भांच्या मालमसाल्यावर पुष्ट झालेली आहे. यावेळी ' मुक्त सुनीतांची ' चर्चा अभिप्रेत नाही. तरी जाता जाता ' मुक्त सुनीता 'च्या प्रयोगक्षम वृत्तीपाठीमागे जी एका प्रगल्भ चिंतनाची लक्षणीयता मला आढळली तिचा निर्देश होणे आवश्यक आहे असे वाटते. कारण ' मुक्त सुनीते ' ज्या कारणासाठी अपयशी झाली (अर्थात हे अपयशही फार महत्वाचे आहे हेही त्यावेळी सुचविण्यात आले असल्याचे मला स्मरते) त्याच कारणासाठी तालचित्रांचे अलौकिक यश मला स्वत:ला जाणवले. त्या यशाचे काही रसग्रहणात्मक विवेचन करण्याची माझी ही धडपड आहे.

तालचित्रांच्या संदर्भात सर्वप्रथम प्रश्न उभा राहतो तो असा की ' आततायी ' अभंग लिहिणाऱ्या आणि ऐनस्टीनच्या भौतिक तसेच मार्क्संच्या समाजवादी विचारांनी भारून वहरून गेलेल्या करंदीकरांसारख्यानी तालचित्रांसारखी निर्मिती का करावी ? समाजस्थ वास्तवातील प्रश्नांप्रश्नांची गुंतागुंत वाढत असताना, जगाच्या आकाशातून अजूनही महायुद्धाचे ' शीत ' ढग पांगले नसताना अथवा त्या जर्मन महात्म्याला अभिप्रेत असणारी ' विदरिंग अवे ऑफ द स्टेट ' ची अवस्था आली नसताना अशा चिंतनशील समाजोन्मुख प्रवृत्तीला तालचित्रांची अपरिहार्यता का जाणवली ? अशी ही निर्मिती पलायनाच्या प्रक्रियेचा आरंभ म्हणावा की तिने काही कलेसाठी निर्मितीचा सोस केला म्हणावा ?

आधीच तर पददलितांच्या व्यथेला शब्दरूप करताना मध्यमवर्गीय बुद्धिवंत कलावंतालाही दुर्बोधतेच्या, पावित्र्यभंगांच्या आणि अश्रद्धेच्या आरोपांच्या सतत टांगत्या तलवारीखाली वावरावे लागत असते. त्यातून पुन्हा ज्यांच्या सुखदु:खांना तुम्ही उद्गार द्यावा त्यांनाच तुमच्या शब्दरूपातील अर्थाचे वगैरे आकलन होऊ नये ही एक वस्तुस्थितीनिदर्शक विसंगतीही पुढे केली जाऊ शकते. ही अडचण करंदीकरांच्याच कवितेसंबंधी उद्भवली असाही काही भाग नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(खरे म्हणजे मर्ढेकर–चित्रे यांना दुर्बोधतेची झळ जितकी पोचली तितकी ती करंदीकर-मुक्तिबोध-बापट यांच्या वाट्यास आली नाही.) या दृष्टीने प्रत्येक प्रगल्भ कलावंताची प्रगल्भ रचना आज एका सामाजिक संकटाचे रूप धारण करीत आहे असेही सांगण्यात येत आहे. अभिजात साहित्याचे आवाहन हे वीस टक्के लोकांपर्यंतच जाऊन पोचत असेल तर अभिजात संगीताचे आणि तालचित्रांचे आवाहन फक्त दहा टक्के लोकांपर्यंतच जाऊ शकते हे दाखविण्यास पुष्कळ आधार आहे. अशा अवस्थेत करंदीकरांनी तालचित्रे लिहून कवितेच्याही अंतर्भागावर कविता का लिहावी ?

आतापर्यंत उपस्थित झालेले प्रश्न हे एका व्यावहारिक मानसशास्त्राच्या आणि पुस्तकी दृष्टीकोनांच्या संबंधात काही मर्यादेपर्यंत खरेही असू शकतील. परंतु प्रत्यक्ष काव्यनिर्मितीच्या क्षणी मात्र अशा प्रश्नांचे स्वरूप बरेचसे उपरे असते. अशा प्रश्नांना उत्तर देणे काही मर्यादेपर्यंत शक्य असूनही ते न देता या संबंधात योग्य प्रश्न उभे करणे हाच या बाबतीत सर्वात कमी धोक्याचा आणि सुरक्षित मार्ग असतो. ते प्रश्न असे—

(१) एखाद्या काव्याची 'अपील' किती संख्येला आहे यापेक्षा स्वतः काव्याची स्वायत्त गुणवत्ता ही काव्याच्या श्रेष्ठपणाची कसोटी होऊ शकणार नाही काय ?

(१) एखादा शब्दरूप झालेला अनुभव बहुजनांच्या डोक्यावरून जात असेल अशा शक्यतेच्या धास्तीस्तव कलावंताने तशी प्रयोगक्षम अभिव्यक्ती थांबविण्यात काव्यकलेचा विकास साधणार आहे काय? वगैरे वगैरे.

एवढे मात्र खरे की या प्रश्नाआधी उपस्थित केलेल्या प्रश्नांना होकारार्थी दृष्टिकोन स्वीकारला तर करंदीकरांच्याच काय, कुठल्याही लहानमोठ्या कलावंताच्या काव्य–व्यक्तिमत्वात अशी द्विधा मनस्थिती शोधणे सहज शक्य होणार आहे. 'तालचित्रे' आणि करंदीकरांच्या इतर काव्यरचनेच्या संदर्भात असे द्वित्व आले आहे काय अथवा त्यांचे काव्य व्यक्तिमत्व द्विधा असण्याऐवजी दुहेरी आहे काय याचा शोध घेणे आवश्यक आहे.

वस्तुतः तालचित्रांची कल्पना संगीतशास्त्राच्या मर्मज्ञांना अगदी नवीन नाही. संगीतशास्त्रातील पंडितांनी रागतालांचे स्वरूपस्वभाव वर्णन करणारी लक्षणगीते यापूर्वीच लिहून ठेवली आहेत. दरबारी कानड्यात याचनेचा भाव प्रधान आहे किंवा बागेश्री श्वेतवस्त्रा आहे तर भैरवी शांतरसकारी आहे, असे या वर्णनांचे मुख्य स्वरूप आहे. अनुक्रमे चौताल आणि आदितालाची लक्षणे करताना ते ते शास्त्रकार लिहितात—

(१) रथा रूढे शंख हस्ते चतुस्त्री परवेष्ठितम ।
गौर वस्त्र धरं ज्ञानमुद्रा भयंकरं द्वयम् ॥
ब्रह्मे वंशो भवंचे वा ताला ध्यायामि मेहिदी ।
पुण्य रूपं सुखं तालं मुख्य ब्रह्म मयं भजे ॥

(२) आसपास सहचरि चायर ले मृदु हलरावे ।
देव यक्ष गंधर्व किन्नरादिक गुण गावे ॥
पूर्ण करत मन कामना उज्वल कीर्ती ललाम ।
आदि ताल पद कमल सादर करत प्रणाम ॥

याच प्रकारचा पण अधिक सुजाण प्रयत्न कै. गोविंदराव टेंबे आणि चित्रकार दलाल यांनी केला आहे. पण गोविंदरावांचा किंवा चित्रकार दलालांचा मुख्य आधार संप्रदायातून आलेल्या संकेतावरच अधिक आहे. त्यातल्या त्यात दलालांनी चित्रकार या नात्याने रागवर्णनमालेतील आत्मनिष्ठेचा अधिक सृजनशील उपयोग करून घेतला आहे. परंतु तरीही करंदीकरांच्या तालचित्रांच्या रसग्रहणासाठी या ऐतिहासिक सांस्कृतिक संकेत-संचिताचा फारसा उपयोग होईल असे वाटत नाही. या सर्व ऐतिहासिकतेतून करंदीकरांनी फार तर लेखनपूर्व अध्ययनासाठी कच्ची सामग्री गोळा केली असावी एवढेच. पण तरी त्यांना तालचित्रांचे निर्मितीक्षम आकर्षण वाटण्याचा एक धागा आपल्याला गवसू शकतो. तो असा की या सांकेतिक वर्णनातूनही प्रत्येक पंडिताच्या स्वतंत्र कल्पनाशक्तीला भरपूर वाव होता. करंदीकरांनी परंपरेने दिलेल्या या आत्मनिष्ठेच्या स्वातंत्र्याचा उपयोग तालरेखाटने करून घेण्यासाठी केला. पण या दोहोतील साम्य मात्र इथेच थांबते. आजवर लिहिली गेली ती लक्षणगीते होती. करंदीकरांनी स्वतःला जाणविलेल्या तालप्रक्रियांचे इंद्रियानुभव घनीभूत करण्याचा प्रयत्न केला. तो करताना प्रत्येक ताल स्वतःच्या (पण तरी करंदीकरांना जाणवलेल्या) नुसत्या स्वभावासहच प्रकट झाला नाही तर त्याने आपल्याला एखाद्या तत्वज्ञाच्या अधिकाराने जीवन-मरण विषयक चिंतन दिले. पुन्हा या चिंतनाचा ठेका कुण्या एकाच एका पोठाचा झाला नाही. म्हटलीच तर तत्वाची लय. पण ती जीवनाची लय होऊन जेव्हा तालचित्रात अवतरते तेव्हा करंदीकरांच्या सृजनशक्तीच्या चौरसपणामुळे माझ्यासारखा अनभ्यस्तही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रात. १९२३
विदर्भ साहित्य संघ

मारावल्याशिवाय रहात नाही. ही तालचित्रे आधी श्रेष्ठ कविता आहे. तबल्याचा बोल हे एक निमित्तमात्र आहे.

करंदीकर आदितालात लिहितात–

> वल्कले झाडावर ठेऊन चोखूर टाकीत मी प्रथम तुझ्याकडे आलो तेव्हा पहाडाला पाठीशी घेऊन उभी होतीस. तो पहाडही नग्नमग्न होता वृषणमत्त वृषभासारखा
>
> माती मध्ये शिग खुपसून....तेव्हा फक्त आदिताल होता..............

त्रितालासंबंधीच्या सर्व जुन्या संकेतांना डोळ्याआड करून करंदीकर इथे त्या आदिम अवस्थेची लय डौलदारपणे आळवितात. तेव्हा जीवनाच्या उत्क्रांतीची पहिली अवस्था सुरू असेल. फक्त नैसर्गिक वासनामय जीवन ! पापपुण्याच्या पोथ्या तेव्हा निघाल्याच नसतील तेव्हा फक्त आयुष्याचं एक विराट नग्न दर्शन. करंदीकरांनी तो काळच एका जिवंत लयीत पुन्हा जागविला आहे. (आणि त्या लयीचं 'वर्णन' करू पाहणारी ही रसग्रहणशवित जागोजागी कशी अडखळत आहे !)

करंदीकर 'दादरा' या तालचित्रात लिहितात–

> 'अंग पिणारे डोळे रंगाच्या मस्तीला शरण जातात. हिवाळ्यात डाळिंबाच्या डहाळीवरचा अनोखा पक्षी उडताना फुलतो, गैशाच्या गालावरील पंख्यासारखा.अशा वेळी दादऱ्यात मिसळून तुला पितात, ते माझे ओठ सहा मात्रेचे असतात.'

मी स्वत:च दादऱ्याच्या लयीत फिरतो आहे. नव्हे, मी स्वत:च लयाकार झालो आहे.. अशा वेळी मी तुला दादऱ्यात मिसळून पितो आहे. आणि माझे ओठ सहा मात्रांचे असतात. शेवटी ते म्हणतात–

> 'तुझ्या अभोगीला हवी असते दादऱ्याची दर्द मिठी'

इथे पुन्हा आठवण येते ती 'ते माझे ओठ सहा मात्रेचे असतात' या ओळीची. प्रेमकविता लिहिल्यानंतर माधवराव पटवर्धनांना प्रणयपंढरीचे वारकरी अशी शब्दचमत्कृती करणारी पदवी मिळाली. दादऱ्यात करंदीकरांनी जो 'शृंगार' केला आहे तो मात्र अशा कुठल्याही पदवीदानापलयाडचा आहे. कविता 'मोगावी'चा सिद्धांत करंदीकरांना 'दादरा' या अक्षर कृतीने दिलाच नसेल असे म्हणवत नाही.

आणि 'झपताल' तर तालचित्रच नसण्याइतपत स्वतंत्र वृत्तीचा आहे. (खरे म्हणजे ही सारी चित्रे नव्हेत. हे प्रत्यक्ष तालच एका चांगल्या अर्थाने Personify झाले आहेत.) झपतालात करंदीकर लिहितात,

> 'तुझी प्रतिबिंबे रेंगाळत असतात ..
> स्वागतासाठी तू 'सुहासिनी' असतेस....
> वाढताना तू 'यक्षिणी' असतेस
> भरवताना 'पक्षिणी' असतेस
> भविष्याकरिता 'स्वप्नमती' असतेस
> संसाराच्या दहाफुटी खोलीत दिवसाच्या चोवीस मात्रा चपखल बसणारी तुझी किमया मला अजून समजलेली नाही.'

झूमऱ्यात किंवा आदितालात तत्त्वज्ञ होऊन येणारा तालपुरुष 'झपतालात' एक मध्यमवर्गीय गृहिणी बनून येतो. 'वाढताना तू यक्षिणी होऊन येतेस' ही मला जाणवलेली झपतालातील एक विलक्षण 'जागा'. करंदीकरांना अशा मोक्याच्या 'जागा' जागोजागी मोठ्या अर्थगर्भपणे बांधून ठेवलेल्या आहेत. ही सारी तालचित्रे व्यक्तिगत अर्थभेदांना जागा ठेऊनही एका पिळदार लयीत फिरताना दिसतात, आणि म्हणूनच संदर्भसूचकतेच्या विशिष्ट विचारधारेला ओलांडून जातील असे जीवनविषयक संदर्भ इथे अतिशय अर्थशील झाले आहेत.

करंदीकरांच्या विलक्षण शब्दशक्तीची जाणीव 'स्वेदगंगा' किंवा 'मृद्गंध' मध्येच झाली होती. 'आततायी' अभंगातून करंदीकरांनी जे जीवन पाहिले त्याचा उच्चार त्यांनी अक्षरश: झपाटलेल्या किंवा 'पिसाटलेल्या' शब्दात केला आहे. तालचित्रातूनही त्यांची ती समाजवास्तव कवेत घेणारी भूमिका मला रेसभरही 'द्विधा' झालेली दिसली नाही. याउलट इथे त्या वैचारिकतेला तालबंधनांची समतोल लय सापडली आहे. करंदीकरांची ही प्रयोगक्षमता मराठी काव्यात केवळ अलौकिक आहे. निसर्गाने त्यांना अधिकअधिक जीवनशक्ती आणि आम्हा रसिकांना कविता भोगण्याची शक्ती द्यावी अशी माझ्याप्रमाणेच अनेकांची प्रार्थना असणार.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्वाचीन तेलगु साहित्य

डॉ. पो. सु. शास्त्री

[नागपूर विद्यापिठातील इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. तुपोकूची सुब्रम्हण्य (पी. एस्.) शास्त्री हे तेलगु भाषेतील नामवंत लेखक व व्यासंगी विद्वान आहेत. आंध्र प्रदेश साहित्य आकादामीचेही ते सदस्य आहेत अर्वाचीन तेलगु साहित्याची ओझरती ओळख करून देणारा एक लेख त्यांनी 'युगवाणी' साठी मुद्दाम लिहून दिला, त्याचा अनुवाद येथे दिला आहे. – संपादक]

१९१६ साली तेलगूभाषी साहित्यप्रेमी तरुणांचा एक गट एकत्र आला व त्यांनी ' साहिती समिती ' नावाचे मंडळ स्थापन केले. त्यांच्यापैकी कोणीच पदवीधर नव्हता, पण इंग्रजी व संस्कृतमधील अभिजात साहित्याचा व प्राचीन तेलगु साहित्यातील उत्कृष्ट ग्रथांचा त्यांचा अभ्यास होता. सर्वसामान्य सुशिक्षित लोक जी भाषा बोलतात त्या भाषेत नवे तेलगु साहित्य निर्माण झाले पाहिजे असा प्रयत्न करणे हे त्यांच्या संस्थेचे उद्दिष्ट होते. प्रत्येकाने कोणत्या तरी एका भारतीय भाषेचा अभ्यास करून त्या भाषेतील उत्कृष्ट साहित्याचा तेलगु भाषिकांना परिचय करून द्यावा असेही या संस्थेच्या सदस्यांनी ठरविले होते. म्हणजे तेलगु, इंग्रजी, संस्कृत या तीन भाषा व ही नव्याने शिकून घेतलेली चौथी भाषा अशा चार भाषा प्रत्येकाला येत होत्या. त्यामुळे उत्कृष्ट ग्रंथांचे अनुवाद, साहित्यसमीक्षा व स्वतंत्र सृजनशील लेखन यांचा तेलगु साहित्यात सुरेख संगम दिसून येऊ लागला.

१९१६ मध्ये स्थापन झालेली ' साहिती समिती ' हाच तेलगु साहित्यातील अर्वाचीन कालखंडाचा आरंभबिंदु. ही समिती आजही अस्तित्वात आहे एवढेच नव्हे तर चांगले कार्य करीत आहे. वर्षाकाठी निदान पाचसात तरी पहिल्या दर्जाच्या ग्रंथांची भर या समितीच्या सदस्यांकडून तेलगु साहित्यात पडत असते.

बोलण्याच्या भाषेत साहित्यनिर्मिती व साहित्यातील कृत्रिमतेच्या उच्चाटनाची धडपड करताना साहजिकपणेच हे नवे लेखक लोकसाहित्यातील काव्यप्रकारांकडे वळले व त्यांनी तेलगु साहित्याला नवे वळण लावले.

श्री. तल्लावझ्झल शिवशंकर शास्त्री (आता शिवशंकर स्वामी) हे या नवीन प्रवाहाच्या निर्मात्यांपैकी एक प्रमुख लेखक. काँग्रेसच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात त्यांनी दोनदा तुरुंगवास भोगला. 'आवेदन' हा त्यांच्या भावकवितांचा पहिला व आपल्या मृतपत्नीवर लिहिलेल्या गीतांचा ' हृदयेश्वरी ' हा दुसरा संग्रह. नंतर त्यांनी काव्यरूप नाटकांची निर्मिती करण्याला सुरवात केली. 'पद्मावती चरण चारण चक्रवर्ती', 'दिक्षित दुहिता', 'कविप्रिया', 'सहजयानपंथी', 'नोणक जाया', वगैरे त्यांच्या नाटयकृती अत्यंत लोकप्रिय झाल्या. 'पलित केशम्', 'वर–परीक्षा', वगैरे त्यांची नाटयमय स्वगतपर गीतेही खूप गाजली. काही बंगाली व हिंदी कादंबऱ्यांचे व बौद्ध जातककथांचे अनुवादही त्यांनी प्रसिद्ध केले.

श्री. शिवशंकर स्वामी हे सध्या आंध्र प्रदेश साहित्य आकादामीचे उपाध्यक्ष आहेत व त्यांच्या काही कवितांचे इंग्रजीत अनुवाद झाले असून 'फर्स्ट लुक अँड अदर पोअेम्स' या नावाचा त्यांचा संग्रह प्रकाशित झालेला आहे.

श्री. शिवशंकर स्वामी नोकरीच्या वाटेने कधीच गेले नाहीत. साहित्यनिर्मिती हेच त्यांचे ध्येय; तोच त्यांचा व्यवसाय.

विश्वनाथ सत्यनारायण हे या नवीन तेलगु साहित्याच्या प्रवर्तकांपैकी दुसरे प्रमुख लेखक. त्यांनी इतिहासाकडे दृष्टी वळवून आपल्या कल्पनेने व प्रतिभेने तो काळ साहित्यसृष्टीत पुन: जिवंत केला. 'आंध्र प्रशस्ती' ही त्यांची पहिली भावपूर्ण रचना. त्यात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांनी पारंपरिक वृत्तांचाच उपयोग केला. नंतर भावकविता हे त्यांचे वैशिष्टय झाले. 'किन्नरसानी पाटलु', (किन्नरीची गीते) हा त्यांचा अत्यंत लोकप्रिय काव्यसग्रह. किन्नरी ही राजमहेंद्री येथे गोदावरी नदीला मिळणारी नदी, तिची ही गीते. नंतर श्री. सत्यनारायण यांनी पारंपरिक धर्तीची नाटके लिहिली. 'नर्तनशाला' व 'त्रिशूलम् या त्यांच्या यशस्वी नाटचकृती कादंबरीच्या प्रांतातही त्यांना चांगला लौकिक प्राप्त झाला. 'वेयी पडगलु (सहस्त्र फणा) या त्यांच्या सर्वोत्कृष्ट कादबरीत आंध्रप्रदेशातील १९१६ ते १९३६ या वीस वर्षांच्या कालखंडाचे सामाजिक, धार्मिक, राजकीय व साहित्यक्षेत्रातील समाजजीवन प्रभावी रीतीने चित्रित केले असून त्या कादंबरीला प्रतिनिधिक स्वरूप प्राप्त झाले आहे. गेली वीस वर्षे श्री. सत्यनारायण हे 'विश्वनाथ रामायणम्, नामक प्रदीर्घ कलाकृतीच्या रचनेत गुंतलेले आहेत . विश्वनाथ हे त्यांचे कौटुंबिक नाव, म्हणून त्यांनी लिहिलेले रामायण हे 'विश्वनाथ रामायणम्'. त्यांच्या प्रतिभेने साकार केलेले हे रामायणदर्शन म्हणज तेलगु साहित्याचे उत्कृष्ट लेणे ठरेल यात शंका नाही।'

श्री. वि. सत्यनारायण हे तेलगुचे नामवंत प्राध्यापक होते व प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाल्यावर साहित्यसेवेतच ते काळ व्यतीत करीत आहेत.

उस्मानिया विद्यापीठातील तेलगुचे सेवानिवृत्त प्राध्यापक रायप्रोलु सुब्बाराव हे या परंपरेतील तिसरे प्रमुख लेखक. विश्वभारतीत त्यांचे शिक्षण झाले. त्यांचा पिंड सौंदर्यपूजकाचा. त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या काव्यात पडलेले आहे. जीवनात जिथे जिथे सौंदर्य आढळेल ते टिपून घेऊन त्याला शब्दरूप करण्याचे कार्य त्यांच्या प्रतिभेने यशस्वी रीतीने केले आहे. त्यांच्या काव्यात वास्तवतेला वाव कमी, सर्व राज्य प्रतिमांचे. 'कष्ट कमल', 'जड कुच्चुलु', 'स्वप्न कुमारम्' व 'माधुरी दर्शनम्' या त्यांच्या काव्यसंग्रहांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र प्रतिमासृष्टी साकार केली ते.हे

काकिनाडा येथे पूर्वी तेलगुचे अध्यापक म्हणून काम करणारे देवुलपल्ली वेंकट कृष्णशास्त्री हे या नवीन तेलगु वाङमयाच्या निर्मात्यांपैकी आणखी एक प्रथितयश लेखक. काही वर्षापूर्वी त्यांची वाचा गेली पण, त्यांची रचना अत्यंत मधुर व संगीतप्रधान आहे 'कृष्णपक्षम्' या त्यांच्या आरंभीच्या संग्रहात शोकमग्न प्रियकराच्या विरहव्यथेचा आविष्कार आहे व पुढे 'उर्वशी' व इतर संग्रहात तेच सूर आळवलेले आढळतात.

या परंपरेतील पाचवे साहित्यिक नंडूरी सुब्बाराव हे या शतकातील सर्वात लोकप्रिय व यशस्वी कवी. त्यांनी जनतेच्या भाषेतच रचना केली असे नव्हे तर एका अत्यंत मागासल्या समजल्या गेलेल्या जातीच्या लोकांच्या भाषेच्या माध्यमाचा वापर करून अत्यंत समृद्ध व प्रभावी काव्यरचना केली. ' येंकी पाटलु ' (येंकीची गीते) ही त्यांची गीते आज घरोघर गाइली जातात. अगदी लहानशा खेड्यातमुद्धा ती गीते पोचली आहेत. येंकी हे नायिकेचे नाव, तिच्या जमातीत पतीचा आदराने उल्लेख करावयाचा म्हणजे 'मामा' म्हणतात. येंकीची आपल्या 'मामा' विषयीची प्रीती व नंतर तिची विरहव्यथा हा या गीतांचा विषय. ही सर्वच गीते तेलगु भाषिकांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहेत.

या प्रभावी परंपरेच्या अनेक लेखकांनी व कवींनी तेलगु साहित्य संपन्न केले. विद्यापीठांमध्ये जनतेच्या तेलगु भाषेला माध्यम म्हणून स्थान मिळावे म्हणून त्यांनी फार मोठा प्रयत्न केला. १९३६ पर्यंतच्या प्रयत्नानंतर दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके व अनेक मासिके त्यांनी काढीज केली व लोकांची बोलण्याची जिवंत भाषा ही त्यांच्या साहित्याचे माध्यम म्हणून सर्रास उपयोगात येऊ लागली. तेलगु साहित्याला यामुळे नवी दिशा मिळाली व त्याची लोकप्रियताही वाढत गेली.

१९३४ च्या सुमारास जहाल प्रवृत्तीच्या लेखकांचा एक नवा गट उदयाला आला. श्रीरंगम् श्रीनिवासराव हे या नव्या प्रवाहाचे त्यांना 'श्री. श्री' म्हणूनच ओळखतात. जुन्या पिढीविरुद्ध बंडाचे निशाण उभारणारे यांचे 'नवकाव्य' 'महाप्रस्थानम्' मधील गीतांमध्ये संग्रहित झाले व स्वताला 'अभ्युदयकवी' म्हणवून घेणारा नवीन पंथ त्या निशाणाखाली एकत्र आला, हे नवकवी व जुने कवी यांना एकत्र आणून त्यांचा समन्वय साधण्याचा एक प्रयत्न झाला व त्यातून 'नव्य साहित्य परि[illegible] माला आली. वर उल्लेखिलेल्या 'साहिती समती'प्रमाणेच या परिषदेचीही वार्षिक अधिवेशने, चर्चा वगैरे नियमितपणे होत असतात. या दोन संस्थांमध्ये मुख्य फरक असा की 'साहिती समिती ' चा भर सृजनशील साहित्यावर, तर परिषदेत तशा कलाकृतींच्या निर्मितीबरोबरच समीक्षावाङमयालाही महत्त्वाचे स्थान आहे व सर्व प्रकारच्या लेखकांना परिषदेत वाव आहे. या परिषदेच्या कार्यामुळे नवीन सृजनशील व समीक्षा वाङमयाच्या निर्मितीला फार मोठे प्रोत्साहन मिळाले. बोलीभाषांचा वापरही साहित्यात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रूढ झाला. बोलण्याच्या भाषेतील शैलीदार गद्य व ङ्मयाची खूपच वाढ झाली. कृष्णा व गुंतुर जिल्ह्यातील सुशिक्षिताची बोलण्याची भाषा त्यामुळे सर्वत्र रूढ झाली. यातूनच दोन श्रेष्ठ विनोदी लेखक पुढे आले. मोक्कापाटी नरसिंह शास्त्री हे लेखक याच प्रवाहाचे प्रतिनिधी. बॅरिस्टर नसलेले बॅरिस्टर पार्वतीशम् या त्यांच्या पात्राला तेलगु वाङ्मयात अढळ स्थान मिळालेले आहे. मुनिमाणिक्यम् नरसिंह राव हे दुसरे श्रेष्ठ विनोदी लेखक. कांतम् ही त्यांच्या कल्पना विश्वाची नायिकाही अशीच अजरामर आहे.

या नव्या कालखंडात तेलगु साहित्यात कादंबऱ्या व कथांची निर्मितीही मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. साप्ताहिकांची संख्या खूप वाढली. नियतकालिकांतून चालू कादंबऱ्यांचे प्रकाशन सातत्याने होऊ लागले. आजही अशा साप्ताहिकांतून वर्षाला आठदहा चालू कादंबऱ्यांचे प्रकाशन सुरू असते. अलिकडेच निधन पावलेले बुच्ची बाबू हे यापैकी एक अत्यंत यशस्वी कादंबरीकार. 'चिवरकु मिगिलेदि' ('शेवटी उरते ते') ही त्यांची प्रख्यात कादंबरी. आदि विष्णु, लिंगराजु, श्रीरामचंद्र मूर्ति, गोपीचंद, सांबशिवराव, कांता राव, वगैरे कादंबरीकारही तेलगु भाषिकांमध्ये अत्यंत लोकप्रिय मानले जातात. या काळात काही श्रेष्ठ स्त्री लेखिकांनीही लोकप्रियता संपादन केली. रंगनायकम्मा, कौसल्या देवी, विशालाक्षी, वेंकटरमणा आदि लेखिकांची पहिल्या दर्जाच्या कादंबरीकारात गणना होते.

या शतकाच्या तिसऱ्या दशकात एक प्रकारच्या अतिवास्तववादाचीही पुष्कळ चलती होती. श्रीरंगम् नारायण बाबु व सिप्ट्ला हे या प्रवाहाचे प्रमुख प्रतिनिधी. पण १९४० नंतर हा प्रवाह संपुष्टात आला. प्रगतिवादाच्या नावानेही अनेक प्रकारच्या शैलीचे व काव्यप्रकारांचे प्रयोग झाले. पण १९५० नंतरच्या कालखंडात निराळे प्रवाह पुढे आले. दाशरथी, नारायण रेड्डी, वगैरे लेखक त्यात प्रमुख होते. डॉ. बेझवाडा गोपाल रेड्डी (सध्या उत्तर प्रदेशाचे राज्यपाल) यांनी टागोरांच्या अनेक कृतींचे तेलगूत रूपांतर केले. यात गोपाल रेड्डींची स्वतःची अशी वैशिष्ट्यपूर्ण छंदोरचना आहे व सर्वच रूपांतर अत्यंत लयबद्ध व नादमधुर आहे.

१९६० नंतरच्या चालू कालखंडात तेलगु साहित्यात एक निराळीच प्रतिक्रिया दिसून येते. तिचा कोणी हिरीरीने प्रचार करीत नाही, पण तिचा प्रभाव स्पष्टपणे दृग्गोचर होतो. समाजाभिमुखता व बोलण्याची भाषा ही दोन वैशिष्ट्ये आजच्या तेलगु वाङ्मयातही आढळतात. पण अभिजात साहित्यप्रकारांची व पारंपरिक मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यावर आज पुनः भर आहे. बोलपट, आकाशवाणी यांनी वीस वर्षांपूर्वीच सामान्य जनतेच्या भाषेचा अंगिकार केला होता व आता आंध्रातील तिन्ही विद्यापीठांनीही भाषा व व्याकरणाच्या जुन्या जीर्ण नियमांबद्दलचा आग्रह सोडून दिला आहे.

आज तेलगु भाषेत ज्ञानाच्या विविध शाखांमध्ये गंभीर स्वरूपाच्या अनेक ग्रंथांची वाढत्या प्रमाणावर भर पडू लागली असून त्यायोगे तेलगु भाषा समृद्ध होत आहे. शिक्षणाच्या विस्तारावरोवर वाचकांची संख्या वाढत आहे व उत्कृष्ट रचनांच्या स्वस्त आवृत्त्यांचे प्रकाशनही होऊ लागले आहे. आज तेलगुमध्ये सृजनशील साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखकांमध्ये दृढ आत्मविश्वास आढळतो व लोकांमध्ये साहित्याची अभिरूची व आवडही वाढत आहे. १९४० नंतरच्या काळात अनेक संस्था व मंडळे उदयाला आली व त्यांच्याभोवती अनेक लहानमोठे लेखक गोळा झाले. परंतु काही श्रेष्ठ लेखक त्यापैकी कोणत्याच संस्थांमध्ये सामील झालेले नव्हते. म्हणून त्या सर्वांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने १९६० साली अखिल भारतीय तेलगु लेखक महासभा स्थापन झाली. दामोदरम् संजीवय्या हे तिचे अध्यक्ष व पोतुकूची सांबशिव राव हे सचिव आहेत. या परिषदेची नियमितपणे संमेलने होतात. यंदा ३१ मे रोजी या परिषदेचे वार्षिक अधिवेशन झाले व डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी त्या अधिवेशनाचे उद्घाटन केले. डॉ. राव हे कानडीभाषिक आहेत व त्यांना तेलगु येत नाही तरी त्यांना उद्घाटक म्हणून बोलावण्यात आले ही घटनाही सूचक व वैशिष्ट्यपूर्ण होती. मॉरिशस बेटातील लोक तेलगु ही आपली मातृभाषा मानतात, त्यांचा एक प्रतिनिधी या अधिवेशनाला आला होता. हे आणखी एक वैशिष्ट्य, तेलगु साहित्यातील उत्कृष्ट ग्रंथ भारतातील इतर भाषिकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्याचे या परिषदेने ठरविले असून त्या दिशेने वाटचालही सुरू झालेलीआहे.

अर्वाचीन तेलगु साहित्यसृष्टीचे ओझरते स्वरूप हे अशा प्रकारचे आहे.

(अनुवादक- प्र. वा. ऊर्ध्वरेषे)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नावात काय आहे
(एक चिंतन)

प्रा. सौ. उषा लिमये

कविवर्य 'बी' यांची 'नावात काय आहे' ही कविता वरवर दिसायला साधी सरळ व सोपी वाटली तरी तिच्यात बराच सखोल आशय साठवलेला आहे हे तिचा सूक्ष्म विचार करणाराला कळते.

अनेकांनी तिचा अर्थ कविपर लावला. अनेकांनी तो रसिकपर लावला. कोणी त्यात दोन्ही अर्थ अभिप्रेत असल्याचे प्रतिपादले आहे. या कवितेचा मला भावलेला अर्थ मी या लेखात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. उत्तम काव्याला वाच्यार्थ, लक्षार्थ व व्यंग्यार्थ असे तीन अर्थ असतात. त्याचीच चौथी बाजू (fourth dimention), आणखी सूक्ष्मतेने पाहता साडेतिसरी मात्रा उलगडण्याचा माझा प्रयत्न आहे.

लाजऱ्या व हळुवार स्वभावाच्या 'बीं' ना कोणीतरी त्यांचे नाव वि[illegible]ले असता संकोच वाटून त्यांनी 'अं, नावात काय आहे' असे उत्तर दिले. हे त्याचे सरळ साधे स्वरूप. मग शेक्सपिअरच्या 'What is there in a name' ची टीकाकारांना आठवण झाली, व नंतर इतर अर्थ निघाले. पण माझ्या मते 'बी' हे अध्यात्मिक वृत्तीचे कवि असल्यामुळे त्यांच्या मनात मी पुढे सांगितलेला अर्थ आलाच नसेल असे म्हणवत नाही.

बी म्हणतात, हे मानवा (मानव म्हणजे सूज्ञ मानवच-म्हणून रसिका) मला नाव सांग असे म्हणतो आहेस, म्हणजेच माझे स्वरूप उलगडून दाखवायला तू सांगतोस. पण ॐकाराच्या अ, उ, म या तीन मात्रांबद्दलचा खल करणाऱ्या पंडिताप्रमाणेच तुझेही पांडित्य व्यर्थ आहे. कारण

'नावात मोहिनी भासे सामान्यासी'

नावाची मोहिनी सामान्य अज्ञ लोकांसाठी आहे. नाहीतर मी नामरूपातीत आहे. सोऽहंच्या गजरात समाधीसुखाची आशा धरणारा योगी सुद्धा अखेर नेतिनेतिच्या Terminus वर येऊन अडखळतो. पण तेथे ठेच लागताच तिच्यामुळेच त्याची समाधि लागते व तो ब्रम्हज्ञानी होतो. तसंच माझं काव्य तुझ्यासमोर आहे. त्याच्यातील अर्थ ग्रहण कर. त्यातील भावानुभावांशी एकरूप होऊन अनिर्वचनीय आनंद घे; आणि ती भावसमाधी लागली की नाव विचारायचे सुद्धा तुला भान नाही.

'नावात मोहिनी भासे सामान्यासी' याचाही अर्थ एक असा की नावाची मोहिनी सामान्य मानवाला-सामान्य रसिकाला-वाटते. पण दुसरा अर्थ सामान्य कवीला नावाची मोहिनी वाटते. फडतूस कविता असली तरी खाली नाव घालायची त्याला घाई होते. उलट श्रेष्ठ कवी असेल तर तो आपले विचार रसिकाला पटले, आपल्या भावनांशी रसिक एकरूप झाला, समरस झाला, त्यालाही काव्यानंदाचा आस्वाद मिळाला तर कवीला अपूर्व आनंद लाभेल. नाव न कळले तरी त्याला काही वाईट वाटायला नको.

मेघमालांनी काळसर निळसर भासणाऱ्या रत्नजडित प्रासादाच्या चंद्रशालेमध्ये जे असंख्य तारे चमचमतांना दिसतात त्यांची ती मोहिनी म्हणजे एक अनिवार्य असे इंद्रजाल आहे. जादू आहे ती ते विश्वावर पसरतात. त्यामुळे वसुंधरा मंत्रमुग्ध होऊ जाते, त्या मंत्राने वेडी होऊन जाते व भ्रमिष्टासारखी स्वतःभोवती व ताऱ्याभोवती (सूर्य हा एक ताराच) फिरत रहाते. म्हणजेच पृथ्वीला मंत्रमुग्ध करून भ्रमिष्टासारखी आपल्याभोवती ते फिरायला लावतात. नसेच आपल्या लुकलुकणाऱ्या नेत्र-संकेताने तिला आपल्याजवळ बोलावतात. तिला आकर्षून घेतात. हे त्या ताऱ्यांचे विलास 'हरिती वस्तुजातहृदयासी', तेव्हा हे मानवा त्या ताऱ्यांची नावे विचारायला कोणी जातो का ? किंवा पृथ्वी तरी ते

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारते का ? तो प्रणयानुभव, तो सौंदर्यानुभव घेत असता अशा मंत्रमुग्ध स्थितीत त्याचे नाव विचारण्याची आठवण तरी रहाते का त्यांना ?

अरण्यामध्ये, वनावनातून अनेक वृक्षलता उगवतात, फुलांनी मोहरून जातात आणि आपल्या गंधांनी सर्व वनाला मारून टाकतात. त्या उन्मत्त करणाऱ्या अशा वनामध्ये जे कविजन शिरले ते स्वत:च त्या तरुलतांशी एकरूप होऊन गेले आणि स्वत:चे नावरूपही विसरून गेले. साऱ्या नामरूपसृष्टीचेच जर त्यांना भान राहिले नाही तर ते स्वत:च्या नावासंबंधी कसे जागरूक असतील ? अशा या कविजनांना काव्यानंदरूपी वारा डोलवीत असतो. मंत्रमुग्ध करून टाकतो. अशा या समाधिस्थितीत ज्याप्रमाणे झाडावरून, वेलीवरून वारा येताच फुले खाली पडतात, तशी या कविजनांच्या भावसमाधीमध्ये त्यांच्या हातून काव्यकुसुमांचा सडा खाली पडतो आहे. ती काव्यकुसुमे तू आपल्या हृदयाच्या ओंजळींनी लुटून घे. त्या फुलांचा सुगंध लुटून घे. ती चाफ्याची आहेत की गुलाबाची आहेत याचा विचार कशाला करतोस ? ती काव्यकुसुमे कोणत्या कवीची आहेत याचा विचार कशाला करतोस ? झाड कोणते का असेना सुगंधाची लूट करणे हे तुझे काम आहे. जसे अर्जुनाला गीतेच्या अकराव्या अध्यायात श्रीकृष्णाने आपले विश्वरूपदर्शन दिले. जे कोणालाही प्राप्त झाले नव्हते, जे चर्मचक्षूंना दिसू शकत नव्हते, ते पाहण्यासाठी देवाने अर्जुनाला दिव्यचक्षू दिले. पण अर्जुन मात्र मूढपणाने देवाला म्हणतो की तुझे नामरूपात्मक सगुण दर्शनच मला प्रिय आहे, हे विश्वरूप वगैरे आपल्याला नको. (तसेच एवढी रसिकता तुझ्याजवळ आहे की काव्यसमाधीचे सुख तुलाही लाभू शकते. ती समाधि लागत असताही निर्विकल्प होऊन काव्यानंद उपभोगायचा त्याऐवजी विकल्प मनात आणून नावाची चौकशी का करतोस ? एवढं काव्यब्रम्ह हाती आलं असताना त्याचा अनुभव घेण्याचे सोडून सामान्यत्वाने नावाची चौकशी कशाला ?)

ज्ञानाचे विज्ञान झाले की ज्ञानही लोपून जाते. ॐकाराचा अनुभव त्याच्या चौथ्या ऊर्धमात्रेच्या अनुभवावाचून येत नाही. उलट तो आला की त्यातील अ, उ, म या तीनही मात्रा एकामागून एक नष्ट होत जातात व फक्त ब्रम्हस्थितीचा अनुभव बाकी उरतो. नाहीतर त्रिगुणात्मक तीन मात्रांचा खल करणारे पंडित (अकाराने उत्पत्ती, उकाराने स्थिती आणि मकाराने उत्क्रान्ती करणारी चौथी 'तूरीय' विराट शक्ती एकच असल्याने अविरोधात्मक शान्त वृत्ती ठेवून साधकाने आत्मतत्त्वाची उपासना करायची, त्यासाठी सगुणशोधाची आवश्यकताच नाही). पंडित हे केवळ अननुभवी, विज्ञानाविना ज्ञान झालेले एवंच काथ्याकूट करणारे पढतमूर्ख ठरतात. तसेच काव्यब्रम्ह हाती आल्यावर त्याच्याशी एकरूप होणं सोडून या काय चौकशा करता ? ऋषीचं कुळ व नदीचं मूळ कशाला शोधायचं ? ॐकाराचे सुद्धा नामरूपात्मक अ, उ, म हे भाव गळायला उरलेल्या अर्ध्या मात्रेचा वळसा हवा. त्या ब्रम्हस्थितीचा अनुभव हे रसिका काव्यसमाधीमधे तुलाही आला की तू त्या नावाची चौकशी करणार नाहीस. काव्यानुभव घेतांना तो निर्विकल्पावस्थेत घे. मग त्या काव्यातून काव्य-शास्त्र निर्माण करतांना किंवा परीक्षणाच्या व्यावहारिक पातळीवर उतरतांना सविकल्प अवस्थेत असल्यावाचून कार्य अशक्य आहे. पण कवींची स्वत:ची काव्यनिर्मितीची समाधी निर्विकल्प आणि त्याची रसिकांकडून अपेक्षाही रसास्वाद घेऊन काव्यानंद मिळवतांना केवळ निर्विकल्प समाधीचीच आहे. म्हणूनच 'नावात मोहिनी भासे सामान्यासी' या ओळीला अर्थ आहे.

श्रीज्ञानेश्वरांच्या

> वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व
> रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥

या काव्याच्या चढत्या वाढत्या श्रेणीचा विचार केला तर कै. आनंदराव टेकाडे यांनी या कवितेचा वाच्यार्थ घेऊन तिला काव्यातच उत्तर दिले तर गुरुवर्य डॉ. मा. गो. देशमुख यांनी त्यातला काव्यार्थ अत्यंत सुंदर रीतीने उकलून दाखवला. आचार्य अत्रे यांनी त्यातल्या आशयाचा रसिकत्वाने मोठा गोड सोज्वल नववधूसारखा लाजराबुजरा अर्थ लावला. पण तत्त्वज्ञ 'बीं' ना भावलेला (असावा असे वाटते) चौथा अर्धमांत्रिक अर्थ, जो कदाचित व्यंगार्थाहूनही आणखी वेगळा आगळा असलेला, तो मी इथे सांगायचा प्रयत्न केलाय वरील कोणत्याही ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्वानांचा अर्थ खोटा ठरवून माझाच अर्थ बरोबर आहे असा माझा आविर्भाव नाही. फक्त हाही अर्थ यातून निघू शकतो हे सांगण्यासाठी या लेखाचे प्रयोजन.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रुद्र वर्षा

(संबंधितांच्या एका चर्चेचा वृत्तांत)

चर्चेचे निवेदक : प्रभाकर पुराणिक

'रुद्रवर्षा' हे श्री. महेश एलकुंचवार यांनी लिहिलेले तीन अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक येथील 'रंजन कला मंदिरा'ने रंगमंचावर आणले मात्र आणि त्यावर स्थानिक वृत्तपत्रांतून आणि मुंबई-नाशिक-कडील कला नियतकालिकांतून त्याचे भलेबुरे पडसाद उमटले.

काही काळ का होईना परंतु नागपूरच्या नाट्य-परिसरात थोडा गहजब माजला. तो गहजब माजला की माजवला गेला हा वादाचा प्रश्न असला तरी त्या नाटकाबद्दल बरेच बोलले गेले हे मात्र नक्की. वास्तविक ही टीका 'रुद्रवर्षा' या नाटकाबाबत अपेक्षितच होती. त्यामुळे सादरकर्ता, नाट्यसंस्था, लेखक, दिग्दर्शक वा नट नाउमेद झाले असे मुळीच नाही.

पण एक गोष्ट मात्र नक्कीच झाली. ती म्हणजे नाटकाचे हितचिंतक व विरोधक यांची मने अगदी तळापासून ढवळून निघाली. प्रत्येकाने आपापल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. काहींनी वृत्तपत्रांतून 'वाच-कांच्या मनोगता'चे स्तंभ खर्ची घातले. काहींनी परि-संवादात आपले विचार व्यक्त केले.

तरीहि नाटकाबाबत किंवा सादर करण्यात आलेल्या नाट्यप्रयोगाबाबत सव्यसाचा विचार होऊ शकला नाही. या संदर्भात स्थानिक नाट्यरसिक आणि समीक्षक श्री. वल्लुमैय्या जोग, नामवंत नट श्री. राजा भाऊ पाठक, स्वतः नाटकाचे लेखक श्री. महेश एल-कुंचवार आणि दिग्दर्शक श्री. प्रभाकर पुराणिक यांनी एक अगदी अनौपचारिक संयुक्त चर्चा केली. चर्चा म्हणण्यापेक्षा बैठकीत व्यक्त केलेले विचार म्हणणे अधिक बरे.

नाटकाच्या प्रयोगावरून बोलायला सुरुवात झाली. श्री. राजाभाऊ म्हणाले, नाट्यप्रयोग बरा झाला. चांगला झाला असा शब्द प्रयोग करताना ते अवघडले असतील म्हणून ते बरा म्हणाले. त्यांना पुराणिकांनी विचारले, तुमच्या मनांत राजाभाऊ, या नाटकाला कशा प्रकारची ट्रीटमेंट आवश्यक होती ? ते म्हणाले, नाटकाची जात बघता त्याला प्रतीकात्मक आणि वास्तववादी या उभय प्रकारच्या ट्रीटमेंटचा समन्वय करून नाटकाची उभारणी करणे योग्य ठरले असते. प्रतीकात्मक पद्धतीने केलेली रंगमंचाची मांडणी आणि त्या पार्श्वावर नटांचा वास्तववादी अभिनय यामुळे नाटककाराला अभिप्रेत असणारा अर्थ प्रयोगाद्वारे रसिकांपर्यन्त जाऊं शकला असता. लेखकाने नाटकात बुद्धीपुरस्सर हेतूने दोन भावनांमध्ये ठेवलेल्या रिकाम्या जागा अधिक स्पष्ट करून दाखवण्यास मदत झाली असती.

यावर स्पष्टीकरण करताना श्री. महेश एलकुंचवार म्हणाले की, हे नाटक दोन पातळ्यांवरुन चालावे अशी अपेक्षा आहे. कारण नाटकात सहा वास्तववादी पात्रे असून त्यांची दुःखे सुद्धा तेवढीच वास्तव आहेत. त्यांची वागणूक, त्यांच्या भावना, एकमेकांना छेदून जाणाऱ्या प्रतिक्रिया आणि आपसातले तणाव हे सगळे वास्तव-वादी आहे. खरे आहे. पण त्यांना जन्म देणारी एक भावना ही मात्र एकाकीपणाची आहे. नाटकातील ही एक पातळी झाली.

पण त्यांच्यावर त्यांना नकळत चाललेले नियतीचे अमानुष राज्य ही नाटकाची दुसरी पातळी म्हणता येईल. त्या सहा पात्रांचे प्रभावीपण कोणत्याही संघर्षा-तून जन्मलेले नाही. एकमेकांविषयीची चीड, त्वेष, त्रागा, एकदुसऱ्यावर आरोप प्रत्यारोप आणि सगळया-तून उद्भवलेली आत्मसंरक्षणाची भावना ही या नाटकाची दुसरी पातळी होऊ शकेल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावर श्री. बल्लुभैय्या जोग यांनी मात्र वेगळया प्रकारची प्रतिक्रिया नोंदवली. ते म्हणाले को त्यांना जाणवलेली नाटकातील पात्रांची दुःखे वास्तववादी नाही. या विश्वसृष्टीच्या आरंभापासून माणूस आणि प्राणी या जिवांना स्वःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी जो संघर्ष करावा लागला तो या नाटकातील संघर्षाशी अधिक जवळचे नाते सांगतो. सध्याच्या सामाजिक जीवनावर सावट होऊन बसलेल्या शोकान्तिकेचा भास श्री. जोग यांना या नाटकांतील पात्रांतून जाणवला. या नाटकातील प्रत्येक पात्राला स्वतःचे दुःख आहे आणि ती सगळी पात्रे विशिष्ट परिस्थितीत एका स्थळी जमलेली आहेत. परंतु एकमेकांच्या दुःखात त्यापैकी कोणीहि समरस होऊ शकले नाही ही त्या पात्रांची खरी शोकान्तिका आहे.

याचं कारण श्री. एलकुंचवार यांनी स्पष्ट करून सांगितलं. ते म्हणाले, नाटकात निर्माण झालेल्या नाटयव्यक्ती भावनेने पुरेशा प्रगल्भ नाहीत. त्यातील डॉक्टर वगळले तर इतरांना भावनेची ती खोली लाभलेली नाही. डॉक्टर मात्र कालदुःखाचे अनुभव घेऊन भावनासिद्ध झालेले आहेत. तसेच इतर पात्रांच्या मानाने यशवंत भावनाक्षमतेच्या दृष्टीने किंचित् समृद्ध आहे. पण तोहि अर्धवट. त्यामुळेच कांही प्रसंगी त्याचे वागणें अतिरेकी भासत असते.

श्री. एलकुंचवार यांच्या या विचारांशी सहमत होऊन श्री. जोग आपले म्हणणे पुढें सांगताना बोलले की, अशा या अपरिपक्व भावनांमुळेच ती सारी पात्रे एकत्र येऊन एकमेकासाठी दुःखांचे भार झाले; आधार होऊं शकले नाहीत. यातील प्रत्येकाचे दुःख वेगवेगळे आहे; त्यांचा परस्परांशी स्पर्श झालेला नाही हे जरी खरे असले तरी दुःखाची साग्रता वा एकात्मता चांगल्या प्रकारे साधली आहे. अशा जातीचे नाटक घराच्या चार भिंतीत घडविले गेले काय किंवा इतरत्र कुठेहि घडले काय त्याला स्वतःचे एक वेगळेच मूल्य असते.

या नाटकाची नेपथ्यरचना वास्तववादी न ठेवता प्रतीकात्मक पद्धतीची असणे आवश्यक होते. नाटकाच्या नेपथ्य रचनेत बरेच ढोबळ दोष आढळून आले. तसेच नेपथ्य उभारणीसाठी वापरण्यात आलेल्या कापडाचा रंग फारच भडक वाटला. या नाटकाच्या जातीला तशी रंगसंगती अपेक्षित नव्हती. ज्या रंगामुळे औदासिन्य निर्माण होऊ शकेल अशा रंगांचा उपयोग करणे इष्ट ठरले असते.

तसेच नाटकातील प्रकाश योजना, रंगदीपन भडक झाले होते. त्यामुळे घरावर दुःखछाया पसरली आहे असे वाटत नाही. प्रकाशाचा रंग सौम्य उदासवाणी पाहिजे होता. म्हणजे प्रसंगाला अनुकूल असे मंदप्रभ वातावरण निर्माण होऊ शकले असते.

वास्तविक नाटकात ज्या प्रकारची प्रकाश योजना करण्यात आली तिला कुठलाच मूळ आधार नव्हता. अर्थ नव्हता. त्यामुळे नाटयप्रसंगाची निश्चित वेळ कळत नव्हती.

त्याचप्रमाणे प्रत्येक पात्राला रंगमंचावर वावरण्यासाठी प्रकाशाच्या सहाय्याने वेगवेगळे प्रकाशपरीघ निर्माण करून देणे आवश्यक होते. त्यामुळे प्रत्येक पात्राचा एकमेकाशी असणारा भावनिक दुरावा जास्त स्पष्ट होऊ शकला असता.

या विचाराला अनुसरून श्री. एलकुंचवार म्हणाले, 'मला या नाटकांत कोणत्याही पात्रांनी, विशेषतः पुरुषपात्रांनी एकमेकांना स्पर्श करणे अपेक्षित नव्हते. त्यामुळे पात्रांमध्ये असणाऱ्या तणावाचा रंगभंग होत होता. पोरकटपणा जाणवत होता.'

यावरून ओघानेच अभिनयाकडे बोलणे वळले. त्याबाबत श्री. राजाभाऊ पाठक म्हणाले की, नाटकातील पात्रांसाठी ज्या परंपरेचा अभिनय करणाऱ्या नटांची निवड दिग्दर्शकाने केली ती अगदीच चूक होती. सर्व नटांचा अभिनय कृत्रिम वाटत होता. एक तर नटांच्या अभिनयाचीच ती जात असावी किंवा दिग्दर्शकाने त्यांना तशा प्रकारचा अभिनय करण्यास सांगितले असावे. ते काहीहि असले तरी नटांचा अभिनय नाटकांतील पात्रानुरूप नव्हता. "मेथड ॲक्टिंग" म्हणून अभिनयाचा जो प्रकार आहे त्याचा वापर करणे योग्य ठरले असते.

या बोलण्याला श्री. जोग यांनी पुष्टी दिली आणि ते पुढे म्हणाले की, नाटकातील भावछटा ज्या सूक्ष्म तऱ्हेने दाखविल्या जायला हव्या होत्या तेवढी सरलता नट दाखवू शकले नाहीत. नाटक वठविण्यासाठी नटवर्ग फार कमी पडला हे श्री. राजाभाऊ आणि बल्लुभैय्या या दोघांचेहि म्हणणे आहे.

[पान १५५ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संशोधनात्मक

म. बसवेश्वर प्रधानमंत्री होते काय ?

सुधाकर मोगलेवार,
एम् ए., बी एड्., साहित्य पारंगत, नागपूर

वीरशैव मत हे प्राचीन व अनादिकालीन आहे. 'यदा यदाहि शैवस्य हानी धर्मस्य जायते' या उक्तीनुसार बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव पंथाचा पुनरुद्धार केला. त्यामुळे विश्वसाहित्याच्या सोनेरी इतिहासात त्यांचे नाव अमर झाले आहे.

भक्तिभांडारी बसवेश्वरांच्या चरित्राचे आकलन करतांना वीरशैव साहित्यात एक वाद उपस्थित झालेला आहे. 'म. बसवेश्वर हे कल्याणच्या बिज्जल राजाचे प्रधानमंत्री नव्हते' असे मत श्री. म. पु. पाटील, अध्यक्ष अ. भा. वीरशैव संघ, बेळगांव, यांनी प्रतिपादन केले आहे. सदर लेख अ. भा. वीरशैव साहित्य संमेलन नागपूरच्या स्मारक ग्रंथात प्रकाशित झालेला आहे. या मताच्या निराकरणासाठी आणि संशोधकांना प्रेरणा मिळावी यासाठी सदर लेख लिहावा लागत आहे.

या लेखात ते म्हणतात की, प्राचीन महापुरुषाच्या चरित्रात वादग्रस्त गोष्टी आढळून येतात. कोणत्याही महापुरुषापेक्षा बसवेश्वराच्या जीवनचरित्रात या गोष्टी अधिक आहेत. त्यांच्या जीवनावर काव्ये व पुराणे अनेक लिहिली गेली. त्यात सांप्रदायिक दृष्टीने व मूढ भक्तिभावनेने अतिरंजित व काल्पनिक गोष्टी घुसडून दिल्या गेल्या आहेत. सांप्रतकाळच्या ग्रंथातही अनेक विधाने अशी आहेत की, ते कलचुरीवंशीय बिज्जल राजाचे प्रधानमंत्री होते. पण प्राचीन शिलालेख व ऐतिहासिक साहित्य यावरून ही गोष्ट असत्य व असंभवनीय आहे, असे मत प्रतिपादन करणारे म. पु. पाटील भारतात एकमेव होत.

वरील मत मांडताना त्यांनी आधारात्मक उदाहरणे दिली आहेत. ते म्हणतात–'बसवेश्वर काव्यपुराणात बिज्जल दुर्बल व हलक्या कानाचा राजा होता. बसवेश्वरावर त्याचा आरंभी संपूर्ण विश्वास असला तरी पुढे राजनैतिक घडामोडीमुळे खटके उडून बिज्जलाला नमते घ्यावे लागत असे. परंतु बिज्जल हा तसा नसून तो पराक्रमी, राजकारणपटू व कावेबाज होता' त्यावेळच्या शिलालेखाचे आधारे हे मत मांडले आहे असे श्री. म. पु. पाटील म्हणतात. पण त्यांनी कोणत्याही शिलालेखाचा अथवा ऐतिहासिक साहित्याचा साधार पुरावा सांगितला नाही. श्री. पाटील म्हणतात त्याप्रमाणे बिज्जल हा राजकारणपटू व कावेबाज असल्यामुळेच उत्तरार्धात बसवेश्वरांनी प्रधानमंत्रीपदाचा त्याग केला होता. हे सांगण्याला ते विसरतात. राजकारणी व कावेबाज माणसे राजकारणात नमते घेत नाहीत, असे म. पु. पाटलांना का वाटते ? पण राजकीय गोष्टींवर मत देताना राजाला मांडलिकाचे मत गृहीत धरावे लागते. बिज्जलाने तसे करणे अवास्तव नाही असे कसे म्हणता येईल ?

श्री. पाटील पुढे म्हणतात की, बिज्जल प्रथम मांडलिक होता व कारस्थानाने चालुक्य साम्राज्याचा सम्राट बनला. राज्य मिळविण्यासाठी त्याने कारस्थान केले होते हे खरे आहे पण आता मिळविलेले राज्य त्याला चालवायचे होते. अशा वेळी त्याला मांडलिकाचे अधिकाधिक सहकार्य आवश्यक ठरते. हेच कोणत्याही व्यवहारचतुर, राजकारणपटू, धूर्त व महात्वाकांक्षी राजाचे आद्यसूत्र आहे. बसवपुराणात तो सुशील, सात्विक व न्यायी राजा होता असे उल्लेख नाहीत. शिलालेख जर बिज्जलकालातच कोरले असतील तर म. पु. पाटलांनी सांगितलेल्या पदव्या पुढे अनेक आदर्श पदव्या बिज्जलास चिकटविता आल्या असत्या. पुराणातील शास्त्रीपंडितांच्या वर्णनाने बिज्जलाच्या स्वभा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाचा सुवर्णमध्य साधला हे पुराणग्रंथांचे वैशिष्ट्य होय.

शिलालेखासंबंधी श्री. पाटील म्हणतात, 'बिज्जलाने १२ वर्षे राज्य केलें व त्याचे कारकीर्दीतील ५० शिलालेख उपलब्ध आहेत. बसवेश्वराचा त्यात उल्लेख नाही.' त्याचे अनेक सरदार, मांडलिक व अधिकारी यांचे उल्लेख दिसून येत नाहीत हे स्वत: पाटील कबूल करीत असतांना बसवेश्वराचा त्यात उल्लेख नाही असे म्हणणे वदतोव्याघाताचे लक्षण होय. बसवेश्वरांचे प्रधानमंत्रीपद म्हणजे लोकराज्यातील मुख्यमंत्री अथवा प्रधानमंत्री पदाच्या महत्वाचे आहे असे पाटलांना वाटते की काय ? १२ व्या शतकातील परिस्थितीचा विचार केल्यावर मुख्यमंत्री म्हणजे मुख्य सरदार, मुख्य अधिकारी, मुख्य कार्यवाह; मग त्याचा ऐतिहासिक पुराव्यात नामोल्लेख केलाच पाहिजे असे राजाला बंधन राहते की काय ? बिज्जलाने कारस्थानाने अथवा महत्वाकांक्षेने स्वत:चे नाव कोरून घेतले असेल तर त्यात सचिवाचा उल्लेख असलाच पाहिजे असे नाही. एखादा सचिव जो पत्रव्यवहार करील तो राजाचे नावाने, स्वत:चे नव्हे. त्यास राजाचेच नावाने उत्तर येईल, सचिवाचे नव्हे. तसेच बसवेश्वराचे उल्लेखनीय शिलालेख असतील तर ते असंशोधित स्वरूपात असणेही शक्य आहे. या दोन्ही बाजूचा विचार होणे रास्त आहे. श्री. पाटलांनी काव्ये व पुराणे यांना निराधार मानून शिलालेख व ऐतिहासिक साहित्यालाच आधार मानले तर बसवेश्वर एक की दोन असाही एक नवीन वाद उपस्थित होऊ शकेल. तसेच १२ व्या शतकात बसवेश्वर होऊन गेले नाहीत असेही नवीनच पिल्लू बाहेर पडू शकेल. पाटलांनी कोणत्या शिलालेख व साहित्यावरून हा निष्कर्ष काढला ते कळत नाही. त्यांच्या मतानुसार बसवेश्वरांच्या वचनात ऐहिक जीवनाचे उल्लेख आढळत नाहीत, पण आध्यात्मिक जीवन व आचारविचाराचे स्पष्ट चित्रण आहे. पण वचनसाहित्याद्वारे बसवेश्वरांना आपल्या जीवनाचा चित्रपट दाखवायचा नसून वीरशैव धर्मोन्नतीचा मार्ग विशद करायचा होता हे लक्षात घेतले पाहिजे. गुरुदेव रानडे यांनी त्यांची तुलना तुकारामाशी केली ती ऐहिक जीवनाचे दृष्टीने नसून अध्यात्म-साहित्याचे दृष्टीनेच होय हे विसरून चालणार नाही. ते साक्षात्कारी संत असल्यामुळे अशा या संताने प्रधानमंत्री होऊन राज्यकारभार चालविणे अशक्य आहे असे पाटलांना वाटते. परंतु एखाद्या लहान प्रदेशाचे राजकारण चोवीस तासाचे असते काय ! कोणताही माणूस कुणाचाही गुलाम असला तरी त्याला सामाजिक, धार्मिक, नैमित्तिक कार्ये सुटू शकतात काय ? या दृष्टीने राजकारण सांभाळून वरील कार्यं बसवेश्वर करीत नव्हते हे म्हणणे हास्यास्पद नाही काय ?

या संदर्भात पाटलांनी महात्मा गांधीचे उदाहरण घेतले आहे 'म. गांधी पूर्ण अहिंसावादी व सत्यवादी असल्यामुळे ते प्रधानमंत्री होणे शक्यच नव्हते, व ते झाले असते तर त्यांची कारकीर्द अयशस्वी झाली असती म्हणून गांधीजींनी कोणतेच अधिकारपद स्वीकारण्याचे मान्य केले नाही. तीच गोष्ट म. बसवेश्वरांची होती,' असे पाटलांना वाटते, याबाबत त्यांनी १२ व्या शतकातील घडामोडीचा संबंध १८ व्या शतकाशी जोडला आहे. तो बरोबर नाही. गांधीजी आर्थिक बाजूने सबळ होते त्यांना प्रधानमंत्रीपदाची हाव होती असे नाही उलट बसवेश्वरांना चरितार्थासाठी नोकरी स्वीकारावी लागली होती. गांधीजींना राजकारण साधायचे होते व बसवेश्वरांना धर्मकारण. 'उद्योग हाच कैलास' या तत्वानुसार त्यांना कोषागार मंत्र्याची नोकरी बिज्जल दरबारी स्वीकारावी लागली. यातील रहस्य काय ? ते संतच होते असे पाटलांचे मत गृहित धरले तर त्यांना त्यावेळच्या संतांप्रमाणे व हल्लीच्या जगद्गुरूप्रमाणे एखाद्या मठ-संस्थेची स्थापना करता आली असती. पण हातात राजदंड घेतलेला माणूस असे करील काय ? स्वत: मानव बनून महामानवतेचे असामान्य कार्य त्यांनी कल्याण नगरात केल्यामुळेच अनेक शिवशरणांचे आश्रयस्थान ते होऊ शकले.

श्रीमान पाटलांनी बसवेश्वरांचे जीवनातील दोन घटना नमूद केल्या. पहिली घटना म्हणजे आश्रमातील गाई गुराख्यांनी पळविल्या असता 'बासरांना गाईकडेच पोहचवा', तसेच चोरांनी त्यांच्या धर्मपत्नीच्या अंगावरील दागिने चोरून नेत असताना 'दागिने ही देवाची संपत्ति असून नेणारा देव आहे' असे त्यांनी सांगितले. या दुसऱ्या घटनेतून त्यांना बसवेश्वरांचे अपरिग्रह व्रत दिसते. पण त्यांचे या घटनेच्या संदर्भातील वागणे प्रधानमंत्री पदाच्या दर्जाचे पाटलांना वाटत नाही. कारण गुन्हेगारांना शासन करणे हे शासकाचे कर्तव्य आहे. पण या बाबतीत राम राजाचे उदाहरण घेता येईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सीतेच्या अनैतिकतेबद्दल धोब्यांनी न काढतांच लोकाग्रहास्तव रामाने सीतेचा त्याग केला म्हणून तो आदर्श राजाच नव्हता असे म्हणता येईल काय ? बसवेश्वरांनी अपरिग्रह व्रताचा धडा स्व-आचरणाने लोकांना शिकविला आणि हे प्रधानमंत्री पदाला साजेसे नाही असे कोण म्हणेल !

ते क्रांतिकारक समाजसुधारक होते असे श्री. म. पु. पाटील म्हणतात, व क्रांतिकारक बसवेश्वरांनी पुराणमतवादी बिज्जलाचे प्रधानमंत्री होऊन राज्यकारभार पाहणे त्यांना हास्यास्पद वाटते. पण राजा व सचिव एकाच जातीचे, धर्माचे असले पाहिजेत, असे बंधन कोणत्या इतिहासात नमूद आहे ? उलट जैन पंथी बिज्जल व वीरशैव बसवेश्वर यांचा समसमा संयोग होण्यास काही घटनाही इतिहासात नमूद आहेत. श्रीमती सरस्वती देवी गोडर लिखित, प्रो. कप्पीकेरी व शिवमूर्ति स्वामी यांनी अनुवादित केलेल्या 'कर्नाटक शिवशरणीयाँ' या ग्रंथात बिज्जल व बसवेश्वर संबंधाचा सोदाहरण उल्लेख केलेला आहे. 'बिज्जलपिता प्रेमीडिने मरतेसमयी सेनाविपती सिद्दण्ण मंत्र्याच्या (बसव. मामा) स्वाधीन बिज्जल व कर्णदेव या दोन पुत्रांना करून जैनवासी झाला. एवढेच नव्हे तर सिद्दण्ण मंत्रीण बहनगंधीने स्वत:चे स्तन कर्णदेवाला पाजून त्याचे पालनपोषण केले होते. पुढे सिद्दण्णाने मरते समयी आपली कन्या निलांबिका देवीला बिज्जलाचे स्वाधीन पालनपोषणास्तव केले होते. बलदेवकन्या संगाबिका हिचेशी त्यांचा विवाह झाल्यावर ते कोषागार मंत्री झाले. त्या वेळी त्रिकालज्ञानाने दरबारात अवाचनीय ताम्रपट त्यांनी वाचून बिज्जलास अलोट संपत्ती मिळवून दिली. त्या वेळी बिज्जलाने बलदेवानंतर त्याचे विनंतीनुसार प्रधानमंत्रीपदाची सूत्रे बसवेश्वराच्या स्वाधीन केली. एवढयानेही त्यांचे समाधान न होता मानलेली बहिण निलांबिकादेवीशी त्यांचा विवाह करून दिला.' (पान १६ व २०). एवढे जिव्हाळयाचे संबंध त्यांच्या सदर महापदाला पोषक होते. तसेच त्या वेळी जैन बिज्जल दरबारात मधुवय्या ब्राह्मण मंत्री देखील होता. म्हणजे जैनेतरांशिवाय इतर पंथीयांना बिज्जलाने वाव दिला होता. पाटील म्हणतात त्याप्रमाणे क्रांतिकारक बसवेश्वरांशी पुढे बिज्जलाचा वेबनाव निर्माण होताच त्यांनी आपल्या पदाचा त्याग करून कुडलसंगम प्रणाम केले हे उचित होय. उच्चवर्णियांनी त्यांचेवर सामाजिक बहिष्कार घातला होता व कर्मठांनी खुनाची धमकीही दिली होती असे पाटील स्पष्ट करतात. थोर विभूतींच्या बाबतीत अशी शेकडो उदाहरणे देता येतील. जन्मेजय, येशू, गांधीजी इ. उल्लेखनीय असतांना सज्जनांना समाजात शत्रू नसतात असे पाटलांना वाटते तरी कसे ?

शेवटी पाटलांना बसवेश्वर कोषागार प्रमुख होते असे वाटते. बसवेश्वर हे प्रथम कारकून म्हणून खजिन्यात काम करीत होते असे म्हणून त्यांनी बसवेश्वरांची कोषागार मंत्र्यापर्यंत बढती करून दिली. प्रधानमंत्री पदाला मात्र त्यांचा विरोध आहे. अशावेळी असा प्रश्न उपस्थित होतो की, बिज्जलाचा खरा प्रधानमंत्री कोण ? याचे पाटलांनी उत्तर दिले नाही. कर्नाटक शिवशरणीयाँ, कर्नाटक प्रांतीय हिंदी प्रचार सभा धारवाडचा रजतोत्सव ग्रंथ, बसवगीता, श्रीबसवेश्वर, बसवेश्वरके चुने हुए वचन, बसवराज, Thus spoke Basava, Spirit of the Cosmos, Lord Basava, इ. अनेक कानडी, हिंदी, मराठी, इंग्रजी, तेलगू वीरशैव ग्रंथात बसवेश्वरांच्या प्रधानमंत्री पदाचे ऐतिहासिक पुरावे सापडतात.

साहित्यक्षेत्रात कोणतेही मत मांडतांना त्याचे भरपूर पुरावे तर्काचे निकषांवर मांडून स्पष्ट करावे लागतात, तेव्हाच त्या मताला पुष्टी मिळते. पाटलांच्या या लेखात शिलालेख अथवा ऐतिहासिक साहित्याचा एकही पुरावा नाही. मग मुळात सत्य असलेली गोष्ट असत्य आहे असे म्हणण्यात उगीच आटापीटा करावा लागतो तशीच पाटील महोदयांची स्थिती झालेली आहे. आजपर्यंत बसवेश्वरांना प्रधानमंत्रीपद बहाल केले असताना त्यांचे ते पद हिरावून घेण्यात पाटलांना कोणते भूषण वाटते ते कळत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दासी 'जनी'चे एक दर्शन

डॉ. शारदा मो. देशमुख, पुणे

महाराष्ट्रातील कवयित्रींचा विचार करू लागले म्हणजे मला जनाबाईचे काव्य फार मोहवतें. मोठी भगवद्‌भक्त म्हणून तिची ख्याती आहे. 'साधुसंतांनी ब्रम्हरूप शुद्ध धातु मोठ्या प्रयत्नाने बाहेर काढली, उद्धव अक्रूरांनी ती आटवली आणि व्यास, वसिष्ठ, नारदमुनींनी टाकसाळ घालून नाण्यावर 'केशव' हा शिक्का मारला.' (२३८०)* नामयाची जनी हे नाणे दरवेळी पारखून घेते. इतकी ती सावध आहे. या सावधपणात तिचा म्हणून काही निराळा वेदान्त आहे असे नव्हे निराळेपण आहे ते पद्धतीत. जनाबाईच्या व्यक्तिमत्त्वाची आगळी तऱ्हा आहे. परमार्थात डुंबत असता देखील तिचे मनोगत वेगळेपणाने व्यक्त झाले आहे.

जनाबाई ही एक बालपणीच पोरकी झालेली आणि नामदेवांच्या घरी काबाडकष्ट करणारी दासी होती. 'विदुराच्या कुळींच्या' आपण, तेव्हा परमेश्वर आपला अंगिकार कसा करणार, अशा तऱ्हेची शंका प्रथम तिच्या मनात आलीही. पण जनाबाई पूर्णत्वाने जगली. स्त्री–त्वाच्या जाणिवेने किंवा दास्यत्वाच्या व्यथेने तिला कधीच दुबळे केले नाही. तिचे मन सैरावैरा कधी मट-कलेच नाही. तुकारामाच्या गाथेत मानवाच्या विविध भावना प्रगट झाल्या आहेत. सामान्य माणसाप्रमाणे 'होईल तो भोग भोगीत आपुला' म्हणून तुकारामांनी तयारी दाखविली आहे. एका फळात अनेक रस एक-वटावेत, एका फुलात हरएक फुलाचा सुगंध दाटून यावा तसे तुकारामांची गाथा वाचतांना वाटते. उलट एक फळ एक प्रकारच्या रसाने थबथबलेले असावे, एक फूल एकाच सुगंधाने न्हाऊन निघावे नि हा सुगंध खूप दूरवर पसरावा, फक्त हाच सुगंध–तसे जनाबाईचे आहे. अगदी खोलवर रुजलेले तिच्या मनात एकच होते ते म्हणजे प्रेम. शुद्ध सात्त्विक प्रेम. जनाबाईचे अवघे ३०० अभंग उपलब्ध आहेत. त्यात जनाबाईचे खरेखरे अभंग आणखीही कमीच. पण या सर्व अभंगात जनाबाईच्या मनाला कातरता कुठे शिवली आहे असे आढळतच नाही. तिचे व्यक्तिमत्त्व अगदी एकसंध आणखी साधे आहे.

नामदेवांच्या घरी जनाबाईला सर्व प्रकारची कामे करावी लागत. रानात गोवऱ्या वेचायला जावे लागे, धुणे धुवावे लागे, भांडी घासावी लागत, पायलीच्या पायली दळण दळावे लागे. नामदेवाच्या घरी माणसे खूप. देहभान विसरून त्या साऱ्यांचे कष्ट जनाबाईला उपसावे लागत. क्षणाची उसंत मिळत नसे. अशा स्थितीत विठ्ठलाची ती सावळी मूर्ति तिच्या हृदयात बिंबली. विठ्ठलप्रेमाने ती व्याकुळ होत होती. पण हा व्याकुळपणा तिच्या स्वभावात होता. संसारात हात पोळला म्हणून ती ईश्वराला हाक मारीत होती असे नव्हे. तिने सावरावा असा तिला संसार नव्हता. त्यामुळे त्याला विटून ती देवाला शरण गेली नव्हती. देवाच्या प्रेमानेच ती देवाकडे गेली आहे. मीराबाई जशी अगदी बाळपणीच श्रीकृष्णाच्या प्रेमात पडली तशी जनाबाईही. पण मीराबाईच्या प्रेमापेक्षा जनाबाईचे विठ्ठलप्रेम वेगळे आहे. एक दैवी पण शरीरधारी प्रियकर म्हणून मीराबाई गिरधर गोपालावर प्रेम करते. प्रेमाच्या तिच्या आकांक्षेत आणि आविष्कारात पार्थिव भावनांपासून दूर पळण्याचा प्रयत्न नाही. श्रीकृष्णाने तिच्याकडे हसून बघावे, तिला शरीरस्पर्शाचे सुख द्यावे याविषयीची उत्कटता ती लपवीत नाही. प्रेमिकेची, वल्लभेची भूमिका ती अगदी आर्तपणाने, सहजपणाने घेते. जनाबाईच्या विठ्ठलप्रीतीत ही भावना कधीच उमटली नाही. मीराबाईचे प्रेम जसे उघडउघड

---

* कंसात दिलेले अभंगांचे आकडे, जोग यांनी संपादिलेली नामदेवांच्या अभंगांची गाथा, पुनर्मुद्रण–४ यातील आहेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वल्लभेचे प्रेम आहे तसे जनाबाईंचे प्रेम हे उघडउघड अतीन्द्रिय स्वरूपाचे, शुद्ध स्वरूपाचे आहे. मीरेप्रमाणे कृष्णाच्या दैवी स्वरूपाचा विसर तिलाही पडला आहे. देव तर तिला रोजच्या सर्व कामात हरप्रकारे मदत करी. तिने झाडलोट केली कीं देवाने केर भरावा, ती रानात शेण्या वेचायला गेली की देव तिला मदत करी. (२४५१,-५२). देवाने जनाबाईसाठी रांजण भरावे, सडासारवण करावे, धुणे धुवावे. (२४९५,२५०१). जनाबाईबरोबर दळण दळायचा तर त्याला छंदच. अशी हलकीसलकी कामे मोठ्या लडिवाळपणे करावीत. 'माझ्याबरोबर येऊ नकोस' म्हणून ती तोडून बोलली तरी 'या चाकराने, मदतीसाठी तिच्यामांगे जावेच. (२४९३). आजपर्यंत अनेक भक्तांनी हरप्रकारे देवाची सेवा केली असेल आणि क्वचित तो त्यांच्यासाठी धावून आला असेल. पण देवाकडून नित्य सेवा घेणारी एकटी जनाबाईच ! 'जनीचिया बोले करी नित्य काम' अशी प्रेमाची हुकमत ती देवावर गाजवी. आपली भक्ति वर्णन करण्यापेक्षा देवाची तिच्याविषयी प्रीतीच तिने अधिक तल्लीनतेने वर्णिली आहे. 'एके दिवशी जनाबाई न्हायला बसली. विसणासाठी थंड पाणी घ्यायला विसरली. देव धावून आला. शीतल पाणी घे, घे म्हणाला' (२४५६). इतकेच काय 'एके प्रसंगी जनाबाई डोईने गांजली. देव धावत आला. तिचा बुचडा सोडला. उवा मारल्या. केस विंचरून मोकळे केले'. (२४५४). दासी जनीच्या प्रेमाखातर देवाने वाटेल ती कामे केली आहेत. जनाबाईच्या या अभंगात कोणता पारमार्थिक अर्थ असेल तो पारमार्थिकांनी जरूर पहावा. प्रस्तुतच्या संदर्भात एवढे खरे की मीराबाईप्रमाणे जनाबाईलाही देवाच्या दैवी स्वरूपाचे स्मरण ठेवावे लागले नाही. देवाने देहधारी माणसांप्रमाणे त्यांचे लाड पुरविले आहेत. त्यांच्या भक्तीविषयी सामान्य जनाला एवढीच माहिती आहे. मीरेने कृष्णाला आळवताना आपली स्त्रीसहजप्रेमभावना व्यक्त करताना त्यातील शारिरिकता लपविली नाही. त्यासाठी गूढगुंजनाचा आश्रय तिने केला नाही. जनाबाईच्या एकरूपतेतही असा गूढगुंजनाचा, अस्पष्टतेचा भाग फारच थोडा. नाहीच म्हणण्याइतका थोडा. भक्ताकरता ईश्वराने धूसर अवकाशातून यावे, मानवी रूप धारण करावे आणि मानवी भक्ताचे लाड पुरवावेत ही मागणी अनेक भक्तांनी केली आहे. मात्र जनाबाईच्या उत्कट मनाने हा अनुभव प्रत्यक्षच घेतला आहे.

जनाबाई एक स्त्री होती आणि आपल्या दास्यत्वाप्रमाणे आपले स्त्रीत्वही परमेश्वरप्राप्तीच्या आड येईल की काय अशी भीति तिच्या मनात यायला हवी होती. पण स्त्री असूनही स्त्रीत्वाच्या भावना तिच्या मनात उदित झाल्या होत्या असे वाटत नाही. जनाबाईचे संतमंडळातील स्थान अढळ आहे. पण संतमंडळापेक्षा भक्तीचा तिचा आविष्कार वेगळा आहे. तसा तो सहजही आहे परमेश्वराची भक्ति करतांना अनेक पुरुष संतांनी स्वतःवर स्त्रीत्वाचा आरोप करून घेऊन आपली भक्तीची गूढ अनिर्वचनीय भावना व्यक्त केली आहे. भक्तीची उत्कटता व्यक्त करताना लक्षणेसाठी स्त्रीपुरुषातील आसक्तीचा आधार घेतला आहे. हिंदी संतकवी कबीर तर स्वतःला 'रामकी बहुरिया' म्हणवीत. जनाबाई मात्र स्त्री असूनही परमेश्वराशी सलगी करताना किंवा त्याच्याशी एकरूपता अनुभवताना देखील स्त्री उरली नाही. कुठेच नाही. बालपणापासून स्त्रीत्वाची रेषाच हरवून बसलेली ही स्त्री आहे. मीराबाईचे अगदी बाळपणीच श्रीकृष्णावर प्रेम जडले. तसे नामदेवांच्या घरच्या भक्तिमय वातावरणात जनाबाईचेही. कृष्णकन्हैय्या घराच्या आसपास फिरतांना तरुण मीरेने पाहिला, आणि ती लज्जेने चूर झाली ! (आवत मोरी गलियनमे गिरधारी । मैं तो छुप गयी लाजकी मारी।) जनाबाईने विठ्ठलावर बालपणापासून प्रेम केले. पण शेवटपर्यंत तिची भावना शुद्ध, अतीन्द्रिय स्वरूपाचीच उरली. विठ्ठल तिला आलिंगन देतो (२५००), निरंतर तिच्या सहवासात राहतो (२५२०), पण तिच्या प्रेमाला शारीर आसक्तीचा स्पर्शच होत नाही 'मायबाप, बंधुबहिणी । तू बा सखा चक्रपाणि' । (२५७५). अशी सर्व नाती येथे एकवटली असली तरी बहुधा जनाबाई विठ्ठलाला 'माऊली' तरी मानते अथवा 'प्रिय सखी विठाबाई'. म्हणजे स्वतःच्या स्त्रीत्वाच्या भावना विसरून तिने त्या देवावर आरोपित केल्या आहेत. तसे करण्यात सामाजिक नीतीचा अवलंब तिला करावयाचा होता असे मात्र नव्हे. तसे असते तर तिच्या विठ्ठलभावनेला वेगळे रूप आले असते. पण तसे नाही. तिच्या प्रेमात पावित्र्याबरोबर निर्हेतुकता आणि आर्ततेबरोबर उत्कटता आहे. आणि म्हणूनच विठ्ठलप्रेमाच्या तिच्या अविष्कारात पार्थिव संकेतांना चिकटून राहण्याचा प्रयत्न आहे असे म्हणणे अन्यायाचे आहे जितक्या अधीरतेने ती विठ्ठलाला 'सखया' म्हणते, भावनेच्या त्याच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बोलाव्याने ती त्याला 'रुक्मिणीच्या कांता' अथवा 'रुक्मिणीच्या कुंका' म्हणून संबोधिते आणि प्रसंगी त्याला 'रुक्मिणीची आण' घालते. तिच्या प्रेमाचे स्वरूपच वेगळे आहे. ती रुक्मिणीच्या प्रेमाचा हेवा करीत नाही आणि इतर भक्तांप्रमाणे विठ्ठलाच्या प्रियेचा आवही आणण्याचा यत्न करीत नाही. तो तिचा स्वभावच नव्हे. विठ्ठलाचे रुक्मिणीवरील प्रेम आपल्यावरील प्रेमापेक्षा भिन्न आहे अशी तिची स्पष्ट समजूत आहे.

जनाबाईने केवळ विठ्ठलावरच असे शरीरनिरपेक्ष प्रेम केले आणि विठ्ठलाच्याच बाबतीत तिला शरीराहून अधिक आकर्षणाचा भाग सापडला होता असे नव्हे. ज्ञानेश्वर आणि नामदेवावरही तिची प्रीति होती. पण तीदेखील वत्साची गाईवर असते तशी. (२४३०, २४४९). किंवा सखीची सखीवर असते तशी. ती ज्ञानेश्वरांना 'आई ज्ञानाबाई' असे म्हणते. ती नामयाची जनी खरी पण 'सखा विरळा ज्ञानेश्वर। नामयाचे जो जिव्हार।' (२५४८) असेही म्हणते. ज्ञानेश्वर 'निःसंगाचा संग अग्रगणी' असे म्हणून ती त्यांचेच ध्यान करते. इतकेच काय मरून जावें नि यांच्याच पोटी जन्माला यावे असे तिला वाटते. परमार्थविचाराची मात झाली असे वाटते तेव्हा ती ज्ञानेश्वरांची साक्ष काढते. नामदेवाबद्दलचे तिचे प्रेम अनुपम आहे, पण तेही त्यांनी तिला आश्रय दिला म्हणून नव्हे तर देवाला नामदेवाचा वियोग सहन होत नसे म्हणून (२७०५). सोपानदेवाविषयी तर 'माझ्या जीवींच्या जीवना। हृदयी राही तू सोपाना' (२६४५) असे ती म्हणते. सर्वांविषयीचे तिचे प्रेम सहजस्फूर्त आहे. पोटात संयम आणि सोवळेपणा ठेऊन ती कुठेच भावनाविष्कार करीत नाही. तिचे प्रेम सहज, अनिरुद्ध आणि शरीरातीत आहे. वत्सल भावनेने ओतप्रोत भरलेले आहे. सेवा हे तिचे व्रत आणि विरक्ति हा तिचा गुण आहे. जनाबाई कुणाची प्रिया नाही आणि कामिनी तर नाहीच नाही. तिच्या हिशेबी विठ्ठल हा राया आहे पण त्र्यैलोक्याचा अथवा रुक्मिणीचा. स्त्रीचे आणि पुरुषाचे मन वेगळे असते, अपेक्षा भिन्न असतात, असे जणु ती मानीतच नाही. ज्या दासीपणाच्या भावनेने प्रथम तिला काचले त्या भावनाच तिने नष्ट करून टाकल्या.

ज्या नावाने जनाबाईने अभंग कीर्ति संपादन केली ते तिचे नाव 'जनी' असे आहे. हे तिचे जन्मनाव नसेलही. ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई अथवा स्वतः नामदेव यांपैकी कोणीतरी तिचे हे नाव नंतर ठेवले असावे. स्वतःचा उल्लेख ती जनाबाई अथवा जनाई असाही करीत नाही. त्याकाळी मुक्ताई, राजाई, असे स्त्रीदर्शक शब्द असत. पण जनाबाई स्वतःला 'जनाई' असे कोठेच म्हणत नाही. 'जनी', 'नामयाची जनी' अथवा 'दासी जनी' असे ती स्वतःला म्हणवते. नामयाची जनी म्हणवून घेताना–

जनी म्हणे जोड झाली विठोबाची।
दासी नामयाची म्हणोनिया।

अशी अभिमानाची भावना गडद आहे. स्वतःला परमेश्वराची दासी म्हणवून घेतानाही तिला आत्यंतिक सुख होते. (२४२१). ती नामदेवाघरची मोलकरीण होती. दासी होती. या दास्यत्वामुळे देवाच्या चरणाजवळ आपल्याला जाता येत नाही म्हणून मात्र तिला दुःख होत होते. दासीला देव आपलेसे करील की नाही हा संशय मनात दाटल्यामुळे ती कष्टी होती. नामदेवपत्नी राजाई व माता गोणाई यांना अखंड परमेश्वराच्या पायापशी रहावयास मिळते व आपण नीच दासी आहोत म्हणून आपल्याला द्वारी उभे रहावे लागते (२४३८) हे तिचे दुःख तिने आडपडदा न ठेवता उघड केले असले तरी 'विदुर सात्त्विक माझिये कुळीचा। अंगीकार त्याचा केला देवे' असा विश्वास बाळगून ती देवापाशी गेली.

जनाबाईचे दास्यत्व जसे परमार्थाच्या आड येऊ शकत होते तसे तिचे स्त्रीत्वही. पण स्त्रीत्वाची निंदा तिने चुकूनही केली नाही. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, इतकेच काय संसार परमार्थरूप करणाऱ्या एकनाथाच्या लेखणीतूनही स्त्रीनिंदा सुटली नाही. पण जनाबाईने स्त्रीनिंदा केली नाही. स्त्री म्हणून आपण जन्माला आलो याचा तिला खेद होत नाही. आपण स्त्री आहोत म्हणून परमार्थमार्गावर वाटचाल करण्याचा आपल्याला अधिकार आहे किंवा नाही अशी शंका तिच्या मनात कोठे डोकावलेली नाही. उलट -

स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास। साधुसंता ऐसे केले जनी (२५४७).

असा दृढ विश्वास ठेवून तिने भक्ति केली. स्त्रीत्वाने तिला काचले नाही. जाचले नाही. कामवासनेचे प्राबल्यही ती जाणते :

काम लागे कृष्णापाठी। केली स्मशानाची गाठी
परम कामे भुलविला। कृष्ण स्मशानासी नेला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भुलविला मनी । रूद्र पाहोनि मोहनी
कन्येचिये पाठी । ब्रम्ह लागे हातवरी
काम पराशरालागी । ज्ञानासी लाविली आगी
काम गेला शुकापाठी । म्हणे जनी मारी काठी
२६१८

एवढ्या प्रभावी भावनेचे तिने समूळ उच्चाटण केले होते. एवं, प्रवृत्तीचा अंकुर जनाबाईच्या जीवनाला फुटलेलाच नव्हता.

परमेश्वरप्राप्तीचा निश्चय करून ती देवाच्या भजनी लागली. नामदेवांनी तिच्या मनाला बोध केला आणि दासी जनी देवाच्या चरणी लागली (२३७७). देवाचे जेथे नाव नाही तेथे आस नको अशा विचाराने दळणीकांडणी हो नामयाची जनी नामस्मरण करू लागली (२३७९). नाममहिमा ध्याता विठ्ठलच होण्याच्या निश्चयाने ती देवाजवळ गेली (२३७९). विठ्ठलाला हाकारू लागली. कृपादृष्टीने वाऊन ये म्हणून विनवू लागली. तुझ्यावाचून मला कोणी नाही म्हणून त्याची आर्जवं करू लागली, पण देव येईना. तिला वाटले त्याने आपल्याला अव्हेरले. गंगा सिंधूपाशी गेली-त्याने तिला अव्हेरले तर तिने कोणाला सांगावे ? जळाने जळचरांचा त्याग केला ; आईने लेकराला दूर लोटले तर – तर जनाबाई म्हणते त्यांचेच ब्रीद गेले. तिच्या शरणागत भावनेत देखील एक प्रकारचा अभिमान आहे. तेज आहे. म्हणून देवाच्या भेटीसाठी व्याकुळ झालेल्या तिच्यामन:स्थितीत आर्तता आहे, दु:ख आहे, ते देवाला उशीर होत आहे याचे. परमेश्वराच्या ओढीने, सर्वान्त:करणाच्या आर्ततेने तिने परमेश्वराची करुणा भाकली आहे. आर्तभूत होऊन तिने हे अभंग गायिले आहेत. देवा, तू का निष्ठुर झालास असे कळवळून तिने देवाला विचारले. देवभेट होईपर्यंत प्राण कंठाशी धरला. आणि एक दिवस तिला पांडुरंगाचे दर्शन झाले. 'सर्वाठायी तुज पाहे । ऐसे देऊनि करी माहेर' अशा अवस्थेला ती पोचली. देवाने अंगिकार केला हा प्रत्यय आला त्या दिवशी ती कृतज्ञतेच्या भावाने उद्गारली :

धन्य मायबापा नामदेव माझा । तेणे पंढरिराजा दाखविले

जनाबाई देवासाठी कष्टत होती. विव्हळत होती. शंकाकुल होती पण पुरी निष्काम होऊन, लौकिक ऐहिक भावना विसरूनच ती देवाला शरण गेली आहे. म्हणून परमार्थमार्गावरून जात असता संसारिकांच्या मनाची दोलायमान मनोवस्था तिची झालेली नाही. देव लवकर येत नाही म्हणून ती त्याला पुन्हा पुन्हा आळवते. तिच्या करुणेत कारुणिकाचा 'का वा, का गा, एक बापा' अशा शब्दांनी रुजू केलेला आर्जवी अनुनयच फक्त आहे. मानवी मोह, लोभ परमेश्वरभेटीच्या आड येत आहेत काय अशी शंका तिला आलेली नाही. किंबहुना या मानवी भावना तिच्या मनात उदित झाल्या नसाव्यात असे वाटावे एवढी विशुद्धता तिच्या सर्व अभंगात काठोकाठ भरली आहे. अहंता कशी गळावी, नम्रता कशी स्वीकारावी, लोकलाज कशी ओलांडावी हे प्रश्न तिला भेडसावीत नव्हते. आत्मज्ञान होऊन मग चित्त निर्विकार झाले असे तिच्या बाबतीत घडले नाही तर आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडावा असे वाटण्यापूर्वीच ती निर्विकार झाली होती. भक्ती ही सुळावरची पोळी आहे असा तिचाही अनुभव होता, पण त्यासाठी 'उदास पै होणे जीवे भावे' हा मार्ग तिला सापडला होता. मनाचा धर्म म्हणून जणु ती उदास झाली होती. 'आहे नाही देह धरी ऐसा भाव । म्हणे जनी देव सहज होसी ।' (२६२३). एवढ्या सहजतेने ती बोलते ! म्हणूनच स्त्रीत्वाची निंदा करण्याची, कामक्रोधांच्या प्रकृतिसिद्ध स्वभावाचा निंदा करण्याची गरज तिला भासली नाही. अंतर्बाह्य जग आणि मन यांचे युद्ध ती जाणीत नाही. संसार आणि परमार्थ यांचे द्वंद्व तिच्या मनात कोठेच नाही. तिचे मन एकरंगी, एकरसी व एकप्रीती आहे. एक भाव, एक स्पर्श, एक रंग आणि एकच गंध– तिचे अभंग वाचतांना मला हा अनुभव येतो. तिच्या 'देहातच देहाभिमानरहित स्थितीने'* राहण्याच्या वृत्तीचा प्रत्यय अधिकाधिक दृढ होत जातो. ती स्वत:ला 'जनी'–ज्ञानी असे म्हणवित. तिच्या अभंगावरून तिच्या व्यक्तिमत्वाचा जो जो विचार करावा तो तो तिच्या नावाची सार्थकता मनाला पटत जाते. किंबहुना ज्ञानेश्वर, नामदेव ही नावे ज्या अर्थाने सार्थ आहेत त्या अर्थानेच 'जनी' हे नाव सार्थ आहे.

* ज्ञानेश्वरी १८ : ४२२–३६.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षणे :

भ व भू ति

(ले.– डॉ. वा. वि. मिराशी, पॉप्युलर प्रकाशन)

समीक्षक : डॉ. शं. दा. पेंडसे

मध्ययुगीन भारतीय महाकवींमध्ये कालिदासाच्या बरोबरीने भवभूतीचे नाव घेतले जाते. कालिदासाने शाकुंतल नाटकात, स्वभावत:च सर्वजनप्रिय असलेल्या शृंगाराला आपल्या प्रतिभेने 'रसराज' पदवीला नेले तर भवभूतीने 'उत्तर रामचरित' नाटकात, दगडालाही पाझर फोडणाऱ्या करुणाच्या आविष्काराने, स्वभावत: अप्रिय असणारा करुणरसही शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवू शकतो हे दाखविले. शाकुंतलाचा नायक पत्नी झालेल्या प्रेयसीला नाकारून वचनभंग करणारा विलासी दुष्यंत राजा आहे तर उत्तर रामचरिताचा नायक राजा रामचंद्र एकपत्नी असून, राजा या नात्याच्या कर्तव्या-करिता प्रिय पत्नीचाही त्याग करणारा आहे. या नाटकांत पत्नीविषयक प्रेम आणि राजाचे कर्तव्य या संघर्षातून निर्माण केलेला उदात्त करुण वाचक-प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घेतो आणि त्याना एका उच्च मानसिक पातळीवर नेतो. कालिदासावर मात करण्याकरिताच भवभूतीने उत्तर रामचरिताचे कथानक निवडले आणि ते रंगविण्याकरिता आपली सर्व प्रतिभा पणाला लाविली असे वाटण्याइतके हे नाटक उत्कृष्ट उतरले आहे. कालिदासाची नाटचसंपदा राजाश्रयाने निर्माण झाली आणि भवभूतीची नाटचसंपदा राजाश्रयावाचून निर्माण झाली हा भेदही लक्षात घेण्यासारखा आहे.

अशा या थोर कवीविषयी आणि त्याच्या नाटच-कृती विषयी संशोधनपूर्वक सर्व प्रश्नांची चर्चा करणारा ग्रंथ मराठीमध्ये उपलब्ध नव्हता. डॉ. नानासाहेब मिराशी यांनी चौतीस वर्षापूर्वी कालिदासावर असा ग्रंथ लिहिला. पण त्यानंतरची तीन तपे मध्ययुगीन भारतीय इतिहासाच्या संशोधनात ते गढून गेल्यामुळे भवभूतीकडे लक्ष देण्यास त्याना वेळ झाला नाही. पण या संशोधनातच भवभूतीविषयी पुष्कळच नवीन माहिती उपलब्ध झाली. तिचा उपयोग करून प्रस्तुतचा भवभूति हा ग्रंथ त्यांनी लिहिला आहे.

भवभूतीने स्वत:च्या पूर्वजाविषयी, जन्मस्थाना-विषयी आपल्या नाटकात कांही माहिती दिली असली तरी त्याच्या कालाविषयी, समकालीन ग्रंथकाराविषयी आणि प्रतिभासंपन्न नाटककार म्हणून आयुष्याच्या उत्तरार्धात मिळालेल्या राजाश्रयाविषयी त्याने कांही लिहिलेले नाही. त्यामुळे त्याचा काल, त्याच्याविषयी इतर कवींनी केलेल्या उल्लेखावरून ठरवावा लागतो. भवभूतीच्या नाटचकृतीवर कालिदासाची छाप कांही ठिकाणी असल्यामुळे तो कालिदासानंतर झालेला आहे. बाण व दंडी यांनी त्याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे इ. स. ७०० च्या पूर्वी तो झालेला नाही. समकालीन वाक्पतिराज आणि इ. स. ८०० नंतरच्या वामन, सोमदेव, धनंजय, भोज, कुंतक, अभिनव गुप्त इत्यादि ग्रंथकारांनी त्याचे उल्लेख केले आहेत. त्यावरून भव-भूतीच्या ग्रंथरचनेचा काल इ. स. ७०० ते ७३० असा डॉ. मिराशी यांनी ठरविला आहे.

भवभूतीच्या जन्मस्थानाची संशोधकापुढे असलेली समस्या डॉ. मिराशी यांनी भरपूर पुरावा देऊन सोड-विली आहे. भवभूति हा वैदर्भ कवि आहे. पण हे मान्य करण्याची संशोधकांची तयारी नाही. वस्तुत: 'महावीर चरित' नाटकाच्या प्रस्तावनेत सूत्रधाराने 'अस्ति दक्षिणा-पथे पद्मपुरं नाम नगरम्' असे सांगून भवभूतीच्या तेथील पूर्वजांची माहिती देताना त्याच्या वडिलांचे नीलकंठ व आजोबांचे नाव गोपाल भट्ट होते असे सांगितले आहे. आणि 'मालती माधवा' च्या प्रस्तावनेत तर सूत्रधार 'अस्ति दक्षिणापथे विदर्भेषु पद्मपुरं नाम नगरम्' असे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्पष्टच म्हणतो. पण या नाटकाच्या अत्यंत प्राचीन प्रतीत 'विदर्भेपु' हा शब्द आढळत नाही. शिवाय सध्या ज्या प्रदेशाला विदर्भ म्हणतात, त्यात पद्मपुर कोठेही नाही. तसेच मध्यभारतात ग्वाल्हेर 'पासून ९० मैलावर असलेल्या प्रचीन 'पद्मावती' नगरीत भवभूति वराच काळ होता. म्हणून ही पद्मावती म्हणजेच पद्मपूर असे संशोधकांचा एक पक्ष म्हणतो. पण पूर्वी (१) वरदा नदीच्या दोन्ही तीरावरील प्रदेशाला विदर्भ म्हणत. मोजकटाप्रमाणे वेण्णाकटाचाहि समावेश विदर्भातच होत असे. म्हणून भंडारा विदर्भातच त्यावेळी मोडत असे (२) 'दक्षिणापथ' हा वादातीत निर्देश नर्मदेच्या दक्षिण प्रदेशाला लागतो. विदर्भेषु हा अनेक प्रतींत असणारा निर्देश दक्षिणापथा'ला जुळणारा आहे (३) भवभूतीच्या वडिलांचे नीलकंठ व आजोबाचे गोपाल भट्ट ही नावे महाराष्ट्रीय आहेत आणि प्रस्तुत लेखकाच्या मते भवभूतीची 'श्रीकंठ' ही पदवी नसून नावच असण्याचा संभव आहे हे लक्षांत घेता भवभूति हा वैदर्भ कवि होता हे मान्य करण्यास प्रत्यवाय असू नये.

डॉ. मिराशी यांनी प्राचीन विदर्भांत असणाऱ्या भंडारा जिल्ह्यातील 'पद्मपूर' हेच भवभूतीचे जन्मस्थान आहे हे भरपूर पुरावा देऊन सिद्ध केले आहे. त्यांच्या 'कालिदास' ग्रंथात मेघदूतांतील रामगिरि म्हणजे सध्याचे रामटेक हे दाखविताना त्यांच्या सूक्ष्म ऐतिहासिक संशोधनाचा जसा प्रत्यय येतो तसाच 'भवभूतीच्या जन्मस्थानाची समस्या' हे प्रकरण वाचताना येतो. भवभूति हा वैदर्भ कवि आहे याविषयी उपोद्बलक असा आणखी एक आनुषंगिक पुरावा देता येईल. 'बाल–रामायणा'चा कर्ता राजशेखर याचे पूर्वज विदर्भांतील वत्सगुल्म (वाशीम) येथे राहत असत. पण त्यांच्या काळी विदर्भात कोणतीच राजधानी नसल्यामुळे त्यांना त्रिपुरी व कनोजकडे जावे लागले. तसाच प्रकार भवभूतीचाहि झाला व त्याला विदर्भांतील पद्मपूर सोडून उत्तरेला जावे लागले असे डॉ. मिराशींनी दाखविले आहे हा राजशेखर त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या भवभूतीचा आपणास अवतार समजतो:– 'स्थितः पूनर्यो भवभूतिरेखया स वर्तते संप्रति राजशेखरः' (बा. रा. १–१६) कालिदास, बाण किंवा दंडी यांचा अवतार न समजता राजशेखर हा आपण भवभूतीचे अवतार आहोत असे म्हणतो याचे कारण भवभूति हा त्याच्याप्रमाणेच वैदर्भ कवि आहे ही त्याला जाणीव असली पाहिजे. भवभूतीच्या नाटकांचा प्रभाव राजशेखराच्या 'बालरामायणावर' पडला आहे. भवभूति व राजशेखर यांच्यासारखे कवि जेथे जन्मतात त्या विदर्भाला त्याने 'विदर्भ त्रिपयःसारस्वती जन्मभू' [बा. रा. १०–७४] असे म्हणणे स्वाभाविक आहे.

भवभूतीचे पूर्वज तैत्तिरीय शाखेचे काश्यपगोत्री, पंचाग्नि ठेवणारे, सोमयाग करणारे ब्रम्हवेत्ते होते व त्यांचे कुलनाम 'उदुंबर' होते असे 'महावीर चरितांतील सूत्रधार म्हणतो. हे उदुंबर म्हणजे विदर्भातील सध्याचे 'उमरखेड' असावे. येथून भवभूतीचे पूर्वज वाकाटकांच्या एका शाखेची काही काळ राजधानी असलेल्या पद्मपुरास गेले. स्वतः भवभूति हा प्रकांडपण्डित होता. वेद, उपनिषदे, मीमांसा, वेदान्त, सांख्य, योग, तंत्र या शास्त्रांप्रमाणेच नाट्य, अर्थ, कामशास्त्रांचेहि त्याचे सूक्ष्म अध्ययन त्याच्या नाटकात प्रतिबिंबित झाल्याचे डॉ. मिराशी यांनी त्याच्या जीवन चरित्रात साधार दाखविले आहे. तो रसिक असला तरी त्याच्या शास्त्राध्ययनामुळे तो गंभीर प्रकृतीचा असावा. त्यामुळे त्याच्या नाटकात 'विदूषक' नाही हे अनुमानहि यथार्थ दिसते आणि रसिक परंतु गंभीर प्रकृतीच्या भवभूतीसारख्या कवीला डॉ. मिराशी यांच्यासारखा संशोधक ग्रंथकार लाभल्याने 'समसमा' संयोग झाल्यासारखे वाटते.

भवभूतीचा संबंध विदर्भ, उत्तरभारत आणि काश्मीर प्रदेशाशी आला होता. राजतरंगिणीत भवभूतीचा उल्लेख आहे. या प्रदेशांतील 'भवभूतिकालीन परिस्थिति' राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात कशी होती याचे सविस्तर दर्शन या प्रकरणांत होते. भवभूतीच्या नाटकाचे प्रयोग ज्या 'कालप्रियनाथा'च्या उत्सवात झाले तो उज्जयनीचा महाकाळ नसून काल्पी येथील कालप्रियनाथ सूर्यदेव आहे हेहि अनेक पुरावे देऊन डॉ. मिराशी यांनी दाखविले आहे.

विदर्भातील पद्मपुराहून भवभूति उत्तरेला एका काळी नाग राजाची राजधानी असलेल्या पद्मावतीला गेला. पण तेथेहि त्याला राजाश्रय मिळालेला दिसत नाही. म्हणून नट मंडळीशी स्नेह करून त्यांच्या साहाय्याने त्याने आपली नाटके काल्पी येथे कालप्रियनाथ सूर्यदेवाच्या उत्सवात लोकांना दाखविली. तेथेहि बरेच दिवस त्याचे वास्तव्य असावे. त्याच्या नाटकांची कीर्ति कनोजचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजा यशोवर्मा याच्या कानी जाऊन आयुष्याच्या उत्त-रार्धात त्याचा आश्रय भवभूतीला मिळाला.

'महावीर चरित' हे त्याचे पहिले नाटक होय. ते चांगले उतरलें नसल्यामुळे रसिक टीकाकारांनी त्यातील अनेक दोष दाखवून त्याचा पाणउतारा केला. तेव्हा चिडून जाऊन, मालतीमाधव या पुढील नाटकात भव-भूतीने त्यांना पुढील अहेर केला.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां ।
जानन्ति ते किमपि ? तान्प्रति नैषयत्नः ।।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा ।
कालोऽह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ।।
(मा. मा. १-६)

"आमची लोकांत जे अवज्ञा करितात त्यांना कांही समजते काय ? त्यांच्याकरिता हा यत्न नाही. माझ्याशी समानधर्मा जो असेल किंवा होईल त्याकरिता हा यत्न आहे. कारण काल अनंत आहे आणि पृथ्वी विशाल आहे" टीकाकारांना जरी भवभूतीने हे आता सर्व प्रसिद्ध असलेले उत्तर दिले तथापि ते नाटक त्याने पांचव्या अंकातच सोडून दिले आणि सुब्रम्हण्याने किंवा विनायक भट्टाने ते पुरे केले असे म्हणतात पुढे केव्हा तरी भवभूतीने त्याला प्रस्तावनेचा कांही भाग जोडून काल्पीला त्याचे प्रयोग केले असावे असा डॉ. मिराशी यांचा तर्क आहे. पण हा प्रयोगहि पहिल्या पाच अंका-चाच असावा असे ते म्हणतात.

भवभूतीच्या महावीर चरित, मालतीमाधव आणि उत्तररामचरित या तीनहि नाटकांचे सविस्तर गुणदोष निरीक्षण हा या ग्रंथाचा गाभा आहे. पाच ते सात या तीन प्रकरणात हे निरीक्षण आले असून त्याने जवळ जवळ दोनशे पाने व्यापिली आहेत. पहिल्या नाटकात वीररस, दुसऱ्यात शृंगार आणि तिसऱ्यात करुण अशा प्रमुख रसांचा आविष्कार करण्याकरिता या पंडित कवीने ही नाटके रचलेली दिसतात. यातील उत्तरराम-चरित हे तिसरे नाटक अत्यंत यशस्वी झाल्यामुळे 'उत्तरेरामचरिते भवभूतिर्विशिष्यते' अशी म्हण पडली व या नाटकाने भवभूतीला दिगंतकीर्ति मिळवून दिली. या सर्व नाटकांची कथानके, त्यातील प्रमुख पात्रांचे स्वभावचित्रण, त्यातील उत्कृष्ट श्लोकांचे भाषांतरासह अवतरण आणि गुणदोष निरीक्षण असे विवेचनाचे स्वरूप असल्यामुळे ते वाचनीय झाले आहे. आठव्या निष्कर्षभूत व उत्कृष्ट प्रकरणात या तीनहि नाटकांतील भवभूतीच्या शैलीचे विशेष सांगून त्याची भव्य कल्पना-शक्ति, सूक्ष्म निरीक्षण, उदात्त विचार या गुणांबरोबरच कृत्रिमता, पाल्हाळ, इत्यादि दोषहि दाखविले आहेत. या नाटकात भवभूतीने मधूनमधून धर्म, तत्त्वज्ञान, राज-कारण, समाजस्थिति, शिक्षण इत्यादिकांविषयी व्यक्त केलेल्या विचारांचा, नवव्या प्रकरणांतील परिचय अत्यंत उद्बोधक आहे. त्याच्या काळी प्रचलित असलेल्या शाक्तपंथाची त्याला घृणा होती असे दिसते.

भवभूति हा श्रौतविद्येचा प्रखर अभिमानी होता. त्याच्या पूर्वजाने केलेल्या वाजपेय यागाचा उल्लेख मोठ्या अभिमानाने त्याने केला आहे. तथापि तो स्वतः वेदान्ती असल्यामुळे, श्रीरामचरितावर दोन नाटके लिहून, शिव आणि सूर्य यांचीहि त्याने स्तुति केली असली तरी महावीरचरिताच्या आरंभी त्याने कोणत्याहि सगुण देवाची स्तुति न करता, चैतन्य ज्योतीला म्हणजे निर्गुण ब्रम्हाला नमन केले आहे.

अद्वैत वेदान्तातील विवर्तवाद शंकराचार्यांनी प्रथम प्रसृत केला ही समजूत डॉ. मिराशी यांच्यामते बरोबर नाही. कारण भवभूतीने पुढील श्लोकात त्याचा दृष्टान्त दिला आहेः- विद्याकल्पेन मरुता मेघानां भूयसामपि । ब्रम्हणीव विवर्तानां क्वापि विप्रलयःकृतः ।। (उ. च.-६-६) तसेच एकच करुणरस निमित्त भेदाने भिन्न होऊन पृथक्पृथक् विवर्तांचा आश्रय करतो याला पाणी व त्यावरील भोवरे, बुडबुडे, तरंग हे पाण्यापेक्षा भिन्न नसताना भिन्न भासतात असा दृष्टान्त दिला आहे. (उ. च. ३-४७) शंकराचार्यांनी ब्र. सू. २-१-१३ वरील भाष्यांत असाच दृष्टान्त दिला आहे. तो त्यांना भवभूतीच्या वरील श्लोकावरून सुचला असावा असे डॉ. मिराशी यांना वाटते. पण शंकराचार्यांच्या काला-विषयीच्या ज्याच्या त्याच्या मतावर ही गोष्ट अवलंबून राहील. भवभूतीच्या पूर्वी आचार्य होऊन गेले असे ज्यांचे मत आहे त्यांना, वेदान्ती भवभूतीला शंकरा-र्यांच्या ग्रंथावरून हे दृष्टान्त सुचले असावे असे वाटेल.

भवभूतीच्या काळी बौद्धधर्माचा प्रसार झाला असला तरी चातुर्वर्ण्यव्यवस्थाहि प्रचलित होती. ब्राम्हण व क्षत्रिय एक झाले तर ते जगाला भारी होतात असें 'दुरासदंच तत्तेजः क्षात्रंच ब्रम्हसंयुतम्' (म. च. २-५) या श्लोकात भवभूति म्हणतो. रामाने शंबुकाचा वध केला ही गोष्ट त्याला लागलेली दिसते. म्हणून 'कृतं च रामसदृशं कर्म' (सं.तात्यागाप्रमाणेच रामाने हे निष्ठुर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कर्म केले) असे उद्‌गार त्याने रामाच्या तोंडी घातले आहेत.

दहाव्या आणि शेवटच्या प्रकरणात भवभूतीचा, उत्तरकालीन संस्कृत नाटकावर झालेला परिणाम सोदाहरण वर्णिला असून भवभूतीचे इतरांनी घेतलेले ऋणहि स्पष्ट केले आहे. या प्रकरणांत ग्रंथकाराचा संस्कृत नाट्य व काव्य वाङ्‌मयाचा सूक्ष्म व्यासंग प्रत्ययाला येतो. कालिदास व भवभूति या दोघांचीच जर नाटककार म्हणून तुलना केली तर 'कालिदास निःसंशयपणे श्रेष्ठ ठरेल (पा.३६८) असे आपले मत देऊन "कालिदास आणि भवभूति यांच्या जोडीस सर्वप्रकारे बसविण्यासारखा तिसरा कोणताही कवी नाही" या मालाकार चिपळूणकरांच्या वाक्याने डॉ. मिराशी यांनी परिश्रमपूर्वक लिहिलेल्या या सुंदर ग्रंथाचा उपसंहार केला आहे.

प्रचलित परिस्थितीत घेण्यासारख्या गोष्टींचा डॉ. मिराशी क्वचित उल्लेख करतात. काश्मीरचा राजा ललितादित्य स्वारीवर असता त्याच्या स्थपतीने त्याच्या नावे 'ललितपूर' वसविले याचा त्याला फार राग आला असे सांगून ते लिहितातः- "स्वतःचे नाव अजरामर करण्याकरीता 'नगरे' स्थापणाच्या आधुनिक राजकीय पुढाऱ्यांनी यापासून बोध घेण्यासारखा आहे". (पा. २५) ललितादित्याने त्याच्या मंत्र्याकरिता घालून दिलेली 'आचारसंहिता उद्‌धृत करून, 'हे विचार आधुनिक कालालाही तितकेच लागू पडतील' (पा. २६, २७) असे ते म्हणतात. यावरून त्यांच्या मनांतील व्यथा व्यक्त होते.

'कालिदास' या सर्वमान्य ग्रंथानंतर हृदयविकाराचा मध्यंतरी उपद्रव झाला असताही डॉ. मिराशी यांनी भवभूतीवर पांडित्यपूर्ण व रसपूर्ण असा हा सर्वांगसुंदर ग्रंथ लिहून मराठी वाङ्‌मयात मोलाची भर घातली आहे. 'त्यातील प्रत्येक प्रकरणात बहुश्रुत वाचकांस नवीन संशोधन, माहिती व विचार आढळतील' 'हा प्रस्तावनेत त्यांनी व्यक्त केलेला भरवंसा साधार आहे असेच प्रस्तुत ग्रंथ वाचल्यानंतर वाचकाला वाटते.

अनेक वर्षांच्या अभ्यासाचा परिपाक असलेला आणि "सामान्य वाचकाकरीता तसेच विद्वान् संशोधकाकरिताही' लिहिलेला हा ग्रंथ, गेल्या चाळीस वर्षांत संसाराची व्यवस्था संभाळून जिने संशोधनकार्याकरिता अवश्य ती फुरसत आणि मनःस्वास्थ्य प्राप्त करून दिले त्या आपल्या सहधर्मचारिणीस ग्रंथकाराने 'प्रेमाने अर्पण केला आहे". अर्पण पत्रिकेंतील कृतज्ञतेच्या आणि प्रेमाच्या या उदात्त भावनांमुळे ग्रंथाची शोभा द्विगुणित झाली आहे यांत शंका नाही.

श्री. मनोहर शहाणे यांची समर्थ कादंबरी

देवाचा शब्द

समीक्षक : श्रीधर शनवारे

मागे 'धाकटे आकाश' ही श्री. मनोहर शहाणे यांची कादंबरी वाचली होती. शहाण्यांच्या त्या पहिल्याच कादंबरीने त्यांच्याविषयीच्या वाङ्‌मयीन अपेक्षा माझ्या मनात वाढल्या होत्या. त्या अपेक्षा पूर्ण करणारी 'देवाचा शब्द' ही त्यांची नवीन कादंबरी नुकतीच वाचण्यात आली.

माझ्या मते, काही वाङ्‌मयीन कलाकृती ह्या विहिरीसारख्या असतात. कमी पसाऱ्याच्या, पण बऱ्याच खोल. उलट काही वाङ्‌मयीन कलाकृती ह्या पोहण्याच्या टाक्यासारख्या असतात. पसरट अधिक, पण त्या मानाने खोलीला जेमतेम. 'देवाचा शब्द' ही पहिल्या प्रकारात मोडणारी कादंबरी आहे, असे मला वाटते.

या कादंबरीतल्या व्यक्ती आणि या कादंबरीची कथावस्तू ह्यांचा आवाका तसा फार मर्यादित आहे. कादंबरीतल्या महत्वाच्या व्यक्ती तीनच. एक माधव, दुसरी त्याची बायको सुषमा, आणि तिसरी माधवची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आई. (म्हणजेच सुषमेची सासू. हे तिचे नाते मुद्दाम सांगायला हवे. कारण तेच या कादंबरीत प्रबलपणे मिरवते.)

माधव-सुषमेच्या लग्नाला दहा वर्षे झाली आहेत. पण ह्या दहा वर्षातसुषमेला मूल झालेले नाही. या अवस्थे-पासून कादंबरीला सुरवात होते. माधवच्या ऑफिसातला उपाध्ये त्याच्या मुलाच्या बारशानिमित्त मित्रांना घरी बोलावतो. माधवलाही बोलावतो—सहकुटुंब. उपाध्ये-कडचे हे निमंत्रण आणि माधव-सुषमाने मिळून त्याच्या कडे जाणे, जाताना मध्ये होजिअरीच्या दुकानातून उपाध्येच्या मुलासाठी बाबासूट घेणे, वगैरे सुरवातीच्या घटनांमधून निपुणिका सुषमेच्या मनातले मूक कढ शहाणे वेचत जातात. 'आपल्याला मूल नाही' या सतत जाणिवेने तिच्याठायी आलेला न्यूनगंड, लाचारी ह्यांचा शहाणे वेध घेत जातात.

सुषमेची सासू ही या घरातली बऱ्यावाईट अर्थाने एक महत्वाची व्यक्ती. मुलगा व सून उपाध्येकडे जाणार याचा कानोसा लागताच ती जिभेला जहर चोळू लागते. "तुम्ही नवराबायको कुठे जाणार ते तरी सांगा. किती वेळ लागेल ते सांगा. म्हणजे मी मोलकरीण स्वयंपाक करून ठेवीन !" या तोफेचे तोंड सरळ सरळ सुषमे-कडेच असते. त्या धक्क्याने सुषमा गोंधळून केविलवाणी होते. तोच माधवचा आवाज. "तू का मुडदाडासारखी उभी आहेस ? पातळ बदल की."

अशी ही मृदंगासारखी सुषमा. तशी सुंदर, सुशिक्षिता पुण्यासारख्या शहरातून नाशिकला आलेली. लग्न ठरले तेव्हा माधवची झोप उडवून देणारी. लग्नानंतर दोघे सिनेमाला गेलीत तेव्हा माधवच्या आकर्षणाचे सारसर्वस्व बनलेली... पण नंतरच्या दहा वर्षात पाचोळा ठरू पाहत होती ! कुणीही पाय देऊन जावे. सासूने, नवऱ्याने. कुणाचा पाय भारी, कुणाचा हलका-एवढाच फरक !

सुषमा सोसत होती. उपाध्येकडे जाताना माधव अंगावर खेकसला तर लगबगीने, होती तशी, माधव-बरोबर ती बाहेर पडली. आणि माधवने मार्गात थोडे कुठे तिच्या चेहऱ्याकडे बघितले तर ती पुन: लाचार झाली: "चेहऱ्यावर पावडर नाही, काही नाही. तुम्ही मनाशी म्हणताय ना, कसली ही बायको ? मी मघाशी पावडर लावली होती हो !"

मनाच्या परिसावर सतत स्वत:ची हीनता उगाळणारी अशी ही सुषमा सुरवातीपासूनच विदारकपणे आपल्या-समोर उभी राहते. शहाणे तिला उभी करतात तिच्या दु:खातून, तिला मिळालेल्या देवदत्त शापातून, आणि तिला न मिळालेल्या घरच्यांच्या सहानुभूतीतून.

तिच्या सासूला तर तिच्या मनोव्यथांकडे पहायला जणू डोळेच नाहीत. ती बुटकी, जाडसर बाई काय पाहील तर सुषमेला फक्त पाण्यात पाहील; आणि काय बोलेल तर तिला फक्त टाकूनच बोलेल—

—"चांगली अर्धीनिर्धी बाई झाली आहेस. तुला संसार कळतो की नाही ?"

—'कसला वडाऱ्यासारखा संसार करत्येस ? तुझं लक्षण काही ठीक दिसत नाही मला."

हे असले माधवच्या आईचे बोलणे. प्रत्येक शब्दाला टोक करून. कारण एकच: घराची घरधनीण व्हायला सुषमेजवळ पदवी नाही !

माधव आईला विरोध करायला राजी नाही. तो तर आईच्या उपकाराखाली गळचाइतका रुतला आहे. कारण त्याच्या लहानपणी, त्याचे वडील वारल्यानंतर, त्याच्या आईनेच त्याचे सारे केले होते. त्याचे लाड केले होते, त्याचे शिक्षण केले होते, त्याचे लग्न केले होते. हे ओझे माधव उरोशिरी बाळगून होता.

सुषमेवरही पूर्वी त्याचे प्रेम होते. लग्न झाले होते तेव्हा. पण आताशा सुषमा त्याला नकोशी वाटायची. नकोशी वाटण्याची काही संभवनीय कारणे होती: एक असे की, ती आईला नकोशी वाटायची. दुसरे असे, की, "या शरीराला नवीन असं काही का फुटत नाही ?" असा विचार होजिअरीच्या दुकानात त्याच्या मनात आला होता. शिवाय असे की, सुषमा दिसायला चांगली. अंगापिंडानेही छान. तेव्हा लोक म्हणत असतील की त्याच्या माधवमध्येच काही कमी असेल म्हणून मूल होत नाही !

पण हे त्याच्या मनातले. बाहेरून व्यक्त होते ती फक्त त्याची अस्थानी चिडचिड. तसा तो सुषमेला घेऊन डॉक्टरकडे सल्ला घ्यायला वगैरे जातो. इतकेच नव्हे तर या बाबतीत जिद्दीने सारे प्रयत्नही करतो. पण हे सुषमेपेक्षा तो स्वत:साठीच अधिक करतो. आपल्याला मूल नाही याची खंत त्यालाही फार आहे. बारशाकरता उपाध्येकडे गेला असतांना उपाध्ये त्याला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

सहज म्हणाला होता. "माधवराव, पान लावा की." पण माधवला त्याचे हे बोलणे वाकडे वाटले. 'हा उपाध्ये घरी बोलवून अंगाला सुया टोचतो' असे तो मनातल्या मनात कुरकुरला होता. 'गादीचा उपयोग आपल्याला ठाऊक नाही, आणि आपल्यात ते सामर्थ्य नाही' असे उपाध्येला सुचवायचे आहे असा त्याने ग्रह करून घेतला होता. तेव्हा, आपल्याबद्दल लोकांनी संशय घेऊ नये म्हणून त्याला सुषमेला मूल व्हायला हवे आहे, सुषमेसाठी नव्हे !

म्हणजे काय तर सुषमा तिचे दु:ख एकटीच भोगत असते. त्यातही माधवची डॉक्टरी तपासणी होऊन तो निर्दोष ठरतो. मग तर माधवसमोर सुषमा एकदम खुजीच होऊन उभी राहते.

त्यानंतर सुषमेच्या ऑपरेशनचे ठरते. ऑपरेशननंतर आपल्याला मूल होऊ शकेल, या भ्रामक कल्पनेमुळे ऑपरेशनची वातमीही तिला आनंद देते ! वास्तविक तिच्या पोटात वाढलेल्या टी. बी. च्या गोळ्याचे ते ऑपरेशन असते. त्यात गर्भाशयाकडे जाणाऱ्या दोनही इन्फेक्टेड नळ्या काढून टाकण्यात येतात ! सुषमेला हे उशिरा समजते. समजल्यावर ती खचूनच जाते. आपले कर्म बडवीत वसते. आपल्या अज्ञात भविष्याला रेषा आखण्याचा तिचा सारा प्रयत्न अयशस्वी झालेला असतो.

अखेरचे म्हणून ते मुंबईच्या डॉ. पाध्यांना भेटतात. ते वयोवृद्ध ख्यातनाम डॉक्टर अशक्यातल्यांच गोष्टी बोलतात. 'तुम्हाला मूल होणं शक्य नाही ! कृत्रिम नळ्या बसवून बघा. दोन अडीच हजार रुपये लागतील ! यशाबद्दल नक्की सांगता येत नाही ! मी काही ज्योतिषी नाही !'

म्हणजे संपलेच ! कुठे ताकद लाभावी असे स्थळच उरलेले नाही. आता फक्त दुसऱ्यांची सहानुभूती आणि दुसऱ्यांचा दिलासा घेत जगायचे ! पण तिची सासू तशाही परिस्थितीत, दिलासा देण्याऐवजी तिच्या दु:खावर डागण्या देते. तिला 'वांझ' म्हणते ! !

आणि सुषमेचे मन चोळामोळा होऊन जाते माधवांवर उन्मळून पडतांनाचा ताण येतो. तिला वेड्यागत व्हायला लागते. कादंबरीच्या अखेरीस स्वत:ला जाळून घेतलेली सुषमा हॉस्पिटलमध्ये मरणोन्मुख पडलेली असते !

आपण कादंबरी संपवून उठतो तेव्हा हॉस्पिटलमधून जड पावलाने आपण परततो आहोत असा भास होतो. याचे कारण शहाण्यांचे वाङ्मयीन सामर्थ्य. शहाण्यांची पात्रे त्यांच्या अवाङ्मयीन मदतीशिवाय वाचकांसमोर जिवंतपणे उभी राहतात, हा एक मोठाच विशेष होय. शहाणे कुठेच कुणावर काही लादण्याचा प्रयत्न करीत नाहीत. वाचकांवर नाही व कादंबरीतील व्यक्तींवरही नाही. त्यांची पात्रे व त्याचे वाचक ह्यांच्यात ते सरळ संपर्क प्रस्थापित होऊ देतात. उदाहरणार्थ, सुषमा तिच्या मनावरील दहा वांझ वर्षांच्या दडपणासहित वागते, वावरते, बोलते, आणि नकळत आपल्या अनुकंपेचा विषय बनते. उपाध्येच्या मुलासाठी ती बाबामूट घेते आणि तो डबा छातीशी घट्ट दाबून धरते; सौ. उपाध्ये तिचे मूल सुषमेच्या मांडीवर ठेवते आणि सुषमा एकदम उमाळून येते. 'माधव माधव, याला माझ्या पोटात शिरू दे रे'. तिचे मन नि:शब्दपणे आक्रंदते; डॉ. विमलाबाईच्या दवाखान्यात सुषमेच्या शेजारी बसलेल्या गर्भवतीच्या पोटाकडे ती चोरून अपराध्यासारखी पुन:पुन्हा पाहते; सिव्हिल हॉस्पिटलमध्ये, कुठे काय बोलावे हे न समजणारी एक बाई सुषमेला बोक्याने लहान मूल खाल्ल्याची गोष्ट सांगते, आणि ते ऐकताच सुषमा चक्कर येऊन पडते. हे प्रसंग आणि ह्या क्रियाप्रतिक्रिया उदासपणे आपल्याला घेरू लागतात. चहूबाजूंनी आपल्या मनी मुरू लागतात. 'पाणी-पातळपणे तळा खणी' तसे.

शहाण्यांची पात्रे एकसुरी अशी नसतातच. खऱ्या माणसासारख्या त्यांच्या स्वभावांना अनेक छटा असतात. त्यातल्या काही गर्द असतील, पुसट असतील, इतकेच. पण या कादंबरीतली माधवची व्यक्तीरेखा विशेषच गुंतागुंतीची आहे. ती नेमकी शब्दात पकडणे फार अवघड. एकीकडे माधवचे त्याच्या आईवर फार प्रेम. कारण वडिलांच्या मागे तिनेच त्याचे सारे केले होते. त्याच्या आयुष्यासाठीच तिच्या हातापायाच्या सुरकुत्या झाल्या होत्या. पण लग्न झाले तेव्हा सुषमेवरही त्याचे खूप प्रेम होते. इतके की त्यावेळी आईच्या छवीचे रंग त्याला फिकट वाटायला लागले होते. आणि मध्ये दहा वर्षे निघून गेलीत-भुस्कट ठरलेली ! कळत नकळत माधव सुषमेच्या बाबतीत विचित्रसा वागू लागला. ऊठसूठ तिला अपशब्दाने बोलू लागला. बावळी, मूर्ख, अनाडी असे संबोधू लागला !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण माधवचा हाही स्वभाव स्थिर नाही. मध्येच त्याला सुषमेची कणवही येते.

–'आपलं ती किती पाहते.'

–'सुषमेच्या बाबतीत आपण अपराधी आहोत.'

–'आपण हिच्यावर उगाच रागावतो ! हिच्या दु:खाचा आपण विचार केला नाही.'

ह्या त्याच्या मनात वेगवेगळ्या वेळी दाटून आलेल्या भावना. पण ह्या भावनाही क्षणजीवी ठरतात. मनी येतात न येतात तोच मावळून जातात.

आणि कधी कधी कुणाला कळू न देता माधव स्वत:बद्दलच साशंक होतो. धड पुरुष नसलेल्या गंगेवरच्या चिवडेवाल्याकडे तो मुद्दाम पण चोरून जातो. आणि त्याच्या व स्वत:च्या शारीरिक हालचाली पडताळून बघतो ! पण डॉक्टरीणबाईंनी "तुम्हीही तुमची तपासणी करून घ्या" असे म्हणताच तो अस्वस्थ होतो. मग चिडतो. हे आपले सुषमेच्या विरुद्ध असलेले द्वंद्व आहे, असे समजतो. आणि कारणाशिवाय सुषमेवर डाफरतो.

सुषमेचे ऑपरेशन झाल्यावर एकदा तीन महिने तिची पाळी चुकते आणि तोच माधव तिच्यासाठी वेणी आणू लागतो ! तिला काही विशेष खावेसे वाटते का, विचारतो ! इतकेच नव्हे तर नेहमी कपाळावर आठ्या कोरून बोलणारी त्याची आईही हसून म्हणते, "दिसतं बरं का !"

असे वाटते की जणू काही माधवच्या व त्याच्या आईच्या क्रिया-प्रतिक्रियांमागे एकच कारणतत्त्व आहे: पोटाचा कप्पा रिकामा असलेली सुषमा.

पण अगदी अखेरीस आसन्नमरण सुषमेला पाहायला जाताना माधवचे मन जे विलाप करते त्याची कुळी आणखीच वेगळी (व कदाचित अधिक खरी) असते. 'सुषमा, मी स्वत: तुझा तिरस्कार करीत नाही ! कुणी करायला लावतं ! कुणी मला सुचवतं ! शिकवतं ! भाग पाडतं !'

एखाद्या व्यक्तीच्या मनातली अशी गिचमिड उलगडून दाखवणे, तिच्या हृदयीचे असंख्य आणि अस्पष्ट पापुद्रे विलग करून दाखवणे, तिच्या स्वभावाचे कोनेकोपरे शोधकपणे धुंडाळणे, हे सोपे नव्हे. पण शहाण्यांना ते साधले आहे. मानवी स्वभावाच्या खोलीत डोकावण्याची गुणवत्ता आणि प्रगल्भ कलात्मकता, ही त्याची कारणे.

'देवाचा शब्द' वाचताना तिच्यातील भाषेची ताकद सारखी जाणवत राहते. इथे दिसणारी प्रभावी अल्पाक्षरता शहाण्यांच्या यापूर्वीच्या दोनही कादबऱ्यांतून प्रकर्षाने लक्षात आली नव्हती. उपाध्येच्या घरी माधवचे मित्र त्याची नको ती थट्टामस्करी करीत असताना माधव आतल्या आत विदीर्ण होत जातो. ही त्याची विदीर्णता शहाण्यांचे शब्द अलगद उचलतात. 'माधव बेवारशी भिकारी होऊन मरून पडला. त्याला टेबलावर टाकलं गेलं. आजूबाजूला मेडिकलचे हे विद्यार्थी.' आणखी एखादा प्रसंग आठवता येईल. माधवची आई सुषमेला अकारण शब्दांच्या धारेवर धरते. त्यावेळची माधवची प्रतिक्रिया शहाणे अशी व्यक्त करतात: 'माधवला वाटलं आपण मध्येच जावं व सुषमेला वाचवावं. पण तो चिवडेवाला कोवळी पोरं घेऊन फिरत होता ना !' डॉक्टरांचे माधवच्या शारीरिक नपुंसकत्वाविषयी काहीही मत असो, त्याच्या मनाचे नपुंसकत्व मात्र शहाणे इथे सूक्ष्मपणे सुचवून जातात.

शहाण्यांची निवेदनपद्धती लक्षणीय आहे. निवेदन करता करता कुठल्याशा धूसर ठिकाणी शहाणे गायब होतात आणि कादंबरीतले एखादे हळवे दुबळे वा गोंधळलेले मन वाचकाला सामोरे होऊन त्याच्या हृदयाशी आपला संवाद साधू लागते. हे काहीसे नवीनच. त्यामुळे जास्तीत जास्त वेळ पात्रांच्या अधिकाधिक निकट राहिल्याचा कलात्मक प्रत्यय शहाणे वाचकांना देऊ शकतात.

अशी ही कादंबरी अंगभूत कलासामर्थ्य असल्याने कुठेही नटवी, कृतक वगैरे न झालेली. पात्रांचे काल्पनिक उदात्तीकरण, वर्णनातले अनावश्यक तपशील, ह्यासारख्या कुठल्याही गैर अंगाला न झुकता तोल सांभाळून उभी असलेली समस्या उभ्या करीत गेलेली आणि अखेरीस त्या न सोडवताच थांबलेली—म्हणजे फडकेपीठाला अचंब्यात टाकणारी. एकंदरीत चांगली.

पण हे सारे सांगून झाल्यावर शांतपणे बसावे तर शहाण्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे दोनच घटक विशेषत्वाने जाणवतात. एक—त्यांचे मर्यादित अनुभवविश्व आणि दोन–त्या मर्यादित अनुभवाचे सर्वांगीण चिंतन, आकलन व ग्रहण. आणि मग श्री. कुसुमाग्रजांनी त्यांच्याविषयी काढलेले उद्गार सहजपणे आठवतात.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाहेरच्या जगापेक्षा आपल्या जगात अधिक राहणारा हा लेखक गावाबाहेर जाऊन संध्याकाळच्या सावल्या अंगावर घेताना अनेकदा दिसतो.'

असो. काही वाङ्मयीन कलाकृती ह्या पोहण्याच्या टाक्यासारख्या असतात. पसरट अधिक, पण खोलीला जेमतेम. उलट काही वाङ्मयीन कलाकृती ह्या विहिरी-सारख्या असतात. कमी पसाऱ्याच्या, पण बऱ्याच खोल.

—पण जेव्हा लांबीरुंदीला मर्यादा नसते आणि खोली अथांग असते तेव्हा त्याला समुद्र म्हणतात.

रुद्रवर्षा [पान १४० वरून]

नाटकातील पार्श्वसंगीत, ध्वनियोजना यावर अगदी मोजकेच बोलणे झाले आणि प्रयोगातील प्रतीकांबद्दल सांगणे सुरू झाले.

श्री. एलकुंचवार म्हणाले की, व्यक्तीचे अस्तित्वच मुळासकट उपटून टाकणे ही शक्ति केवळ नियतीतच आहे. या नियतीचे वास्तव्य म्हणूनच भीषण वर्षा प्रतीक म्हणून वापरण्याचा यात प्रयत्न केला गेला आहे. क्रूर नियतीचे प्रतीक म्हणून वावरणारा हा पाऊस नाटकांतील घटनांच्या दृष्टीनेहि तितकाच महत्वाचा आहे.

या संपूर्ण चर्चेत या नाटकाचे दिग्दर्शक श्री. प्रभाकर पुराणिक यांनी तसा फार कमी भाग घेतला ते विशेष बोलले नाहीत. कदाचित त्यांच्याजवळ नाटकाच्या समर्थनार्थ काही सांगण्यासारखे नसावे. श्री. पुराणीक हे या वादसंवादांत एकूण दहा ते पंधरा वाक्ये बोलले असतील. त्याचा सारांश पुढील प्रमाणे आहे :—

' हे नाटक मला प्रतिकात्मक वाटले नाही. यातील पात्रे आणि त्यांची दु:खे मला खरी वाटली, त्यामुळे मी त्या संपूर्ण नाट्य प्रयोगाला वास्तववादी ट्रीटमेंट दिली. नाटकातील व्हील चेअर, कुबडया कपबशा व त्यातील चहा, बाहेर गावाहून येणाऱ्या पाहुण्याच्या सूट केसेस्, ताप बघण्याचे थर्मामीटर वगैरे वस्तू खऱ्या अर्थाने वापरल्या जाव्या अशी सूचना नाटकात होती त्यामुळे मी त्याला वास्तववादी ट्रीटमेंट दिली.

नाटक चांगले होते, नट चांगले होते. नाटक जर कुठें कमी पडले असेल तर ते माझ्या अज्ञानामुळे; नाटकाला आवाका माझ्या बुद्धीच्या कवेत न आल्यामुळे असेल कदाचित्

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथपरिचय

चंद्रकांत कुळकर्णी

गीत जुने सूर नवे

(लेखक–प्रा. ना. सी. फडके
प्रकाशक–कुळकर्णी ग्रंथागार, पुणे)

"सुखदुःखानी भरलेल्या या जीवनाच्या गीताचा प्रारंभ केव्हा झाला ते कुणाला माहीत नाही, अंत केव्हा होणार आहे तेही कुणाला माहीत नाही. हे जुनं गीत अखंड चालू आहे. परंतु जन्माला येणारा प्रत्येक जीव आपला म्हणून एक नवा सूर घेऊन येतो ! त्या नव्या सुरानं ते जुनं गीत समृद्ध होतं !"

हा नवीन विचार प्रा. ना. सी. फडक्यांनी आपल्या या नवीन कादंबरीत मांडलं आहे. अहिल्या वेळवीच्या सुखदुःखांकित जीवनाचे अत्यंत कलात्मक चित्रण या मराठी कादंबरीच्या 'जादुगारा'नें या कादंबरीत केले आहे. कथानकाची चमत्कृती, प्रसंगाची सुबक गुंफण, पात्रांच्या स्वभावविशेषांचे सुस्पष्ट रेखाटन, मोहक भाषाशैली इ. फडके तंत्राची सर्व वैशिष्टें या कादंबरीत आढळतात. अहिल्या वेळवीच्या जीवनात येणारी डॉ. चैतन्य देसाई, माई, डॉ. हेरेकर, यदुकाका, मिलिंद राजहंस, स्टेफी वेकर, जिम टर्नर, मनोहर सावंत इ. पात्रांचे स्वभावचित्रण अत्यंत कौशल्याने करण्यात आले आहे. 'एक होता युवराज' या कादंबरीपासून खोल चिंतनाचा एक नवीन गुण अप्पासाहेबांच्या कादंबरीत आढळून येत आहे, तो या कादंबरीत जाणवतो.

आचार्य प्र. के. अत्रे यांच्या हस्ते या नवीन कादंबरीचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले. प्रा. ना. सी. फडके यांची ही बासष्टावी कादंबरी.

कऱ्हेचे पाणी खंड ५

(लेखक–आचार्य अत्रे
प्रकाशक–परचुरे प्रकाशन मुंबई मूल्य रु. ३०)

आचार्य अत्र्यांसारखं विविध अनुभवांनी संपन्न असं आयुष्य इतर लेखकांनी उपभोगलं नाही. त्यांच्या विविधरंगी आयुष्याचे दर्शन देणारे आत्मचरित्राचे चार खंड यापूर्वी प्रसिद्ध झाले आहेत. प्रस्तुत पाचवा खंड नुकताच प्रसिद्ध झाला. या खंडात १९५४ ते ६० पर्यंतचा म्हणजे 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र' निर्माण होईपर्यंतचा वृत्तांत आलेला आहे. या चळवळीत आचार्य अत्र्यांनी फार मोठी कामगिरी बजावली. मराठी माणसाने दिलेल्या या प्रचंड लढ्याचे अत्यंत सुंदर चित्रण आचार्यांनी प्रस्तुत खंडात केले आहे. या आत्मचरित्राचे एकंदर आठ खंड प्रसिद्ध होणार आहेत. अत्रे शैलीचे सर्व गुणविशेष प्रस्तुत आत्मचरित्रात आढळतात.

केतकरी कादंबरी

(लेखक–दुर्गा भागवत प्रकाशक–मौज प्रकाशन, मुंबई
मूल्य रु. १०)

मराठी वाङ्‌मयात डॉ. केतकरांचे नाव एक वादग्रस्त व्यक्ति म्हणून प्रसिद्ध आहे. कादंबरी वाङ्मयात त्यांना श्रेष्ठ स्थान देण्यापासून ते कादंबरीकार नाहीत' इथपर्यंत टीकाकारांनी त्यांच्या कादंबऱ्यांचे मूल्यमापन केले आहे. दुर्गा भागवतांनी 'केतकरी कादंबरी' हा प्रबंध लिहून केतकरांच्या कादंबऱ्यांचे नव्याने परीक्षण करण्याची आवश्यकता पटवून दिली आहे. 'डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या या साजाजिक विचारकथा आहेत' हा नवीन मुद्दा त्यांनी या पुस्तकात मांडलेला आहे. मराठी समीक्षकांच्या विचाराला चालना देणारी नवीन समीक्षा असे या प्रबंधाचे थोडक्यात वर्णन करता येईल.

नवे पान

कविवर्य–दत्तात्रय कोंडो घाटे यांची संपूर्ण कविता
संपादक–डॉ. माधव गोपाळ देशमुख
प्रकाशक–सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर–पुणे

"आत्मप्रत्यय आणि आत्माविष्कार हा आधुनिक मराठी कवितेचा मुख्य विशेष मानला जातो. तो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दत्तांच्या कवितेत फार मोठ्या प्रमाणात दिसून येतो असे दिसत नाही. त्यांची मनोवृत्ती अंतर्मुख आहे की बहिर्मुख आहे हेही फारसे स्पष्ट होत नाही. पण इतर कवींनी हाताळलेले विषय घेऊन तीच ती वैशिष्ट्ये प्रामुख्याने मिरविणारी दत्तांची कविता आपल्या शिशुगीतांच्या व करुणरम्य भावगीतांच्या वेगळ्या प्रकारच्या तेजामुळे महाराष्ट्र सारस्वतात नंदादीपा-प्रमाणे अखंडपणे तळपत राहील यात शंका नाही "

एखाद्या मनकवड्या भविष्यवाद्याप्रमाणे उपभोगि-लेल्या खुद्द कवीच्याच शब्दांत त्याच्या कवितेचे वर्णन करावयाचे झाल्यास 'दत्तकवींनी आधुनिक मराठी काव्य-ग्रंथाचे नवे पान उघडले' असे करावे लागेल.

विठ्ठलराव घाटयांनी यापूर्वी दत्तांची कविता संपा-दित केली होती. आधुनिक मराठी काव्याचे एक प्रमुख समीक्षक डॉ. माधवराव देशमुख यांनी नव्याने घाटयांची संपूर्ण कविता संपादित केली असून माधवरावांसारख्या रसिक व मार्मिक टीकाकाराची प्रस्तावना प्रस्तुत ग्रंथास लाभलेली आहे. कवि चंद्रशेखर यांचे हृद्गत व विठ्ठलराव घाटयांनी करून दिलेला दत्तांचा परिचय व त्यांच्या काव्याचे केलेले रसग्रहण या पुस्तकास जोडलेले आहे.

दत्तांच्या काव्याचे पुनर्मूल्यन या पुस्तकामुळे आधुनिक मराठी काव्यसमीक्षेत परत होईल याविषयी शंका नाही.

शापित गंधर्व (कथासंग्रह)

(लेखक–गोपाळकृष्ण भोबे,
वा. ल. पाठक प्रकाशन, मुंबई २, किंमत रु. ४)

कै. गोपाळकृष्ण भोबे यांनी आपल्या संगीत व सांस्कृतिक लेखांनी महाराष्ट्रात एक खास वाचकवर्ग निर्माण केला आहे. 'शापित गंधर्व' हा त्यांचा पहिला व शेवटचा कथासंग्रह. संगीताच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या या कथा सर्वस्वी सत्यकथा आहेत. उत्तम भाषाशैलीचे लेणे त्यांना लाभले आहे. रसिकांना हा कथासंग्रह म्हणजे साहित्य व संगीताचा मनोज्ञ संगम वाटेल. श्री. भोबे यांनी खूप लिहावे आणि त्यांच्या लेखनाची माधुरी रसिकांना अशीच चाखावयास मिळावी अशी इच्छा सर्व रसिकांची होती. परंतु भोब्यांच्या दुःखद निधनाने रसिक त्याला मुकला आहे. सुप्रसिद्ध चित्रकार दीनानाथ दलाल यांची मार्मिक प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे.

कुणी कोडे माझे उकलील का ! (कथासंग्रह)

(लेखक–प्रा. ना. सी. फडके
प्रकाशक–परचुरे प्रकाशन, मुंबई)

मराठी लघुकथेच्या प्रांतात प्रा. फडके यांचे विशेष स्थान आहे. मराठी लघुकथेला तंत्र आणि मंत्र देऊन त्यांनी मराठी लघुकथेला वाचनीय बनवली. त्याचा प्रत्यय परत नव्याने या कथासंग्रहात येतो. फडके प्रणित तंत्राचे सर्व गुणविशेष प्रस्तुत संग्रहात आढळतात. महाराष्ट्राचे नटसम्राट कै. बालगंधर्व यांच्या अखेरच्या जीवनावर आधारलेली हृदयस्पर्शी कथा ('कुणी कोडे माझे उकलील का ?') या कथासंग्रहात समाविष्ट करण्यात आली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(आक्टोबर १९६८)

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

नाट्यसमिती

नाट्यसमितीतर्फे नाट्याचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिनानिमित्त सोमवार दि. २५ ऑगस्ट ६८ रोजी सायं. ६-३० वा. नाट्यइतिहास संशोधक श्री. के. टी. देशमुख यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

सांस्कृतिक समिती

कविवर्य कै. नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ कवी 'बी' यांचा २१ वा स्मृतिदिन शुक्रवार दि. ३० ऑगस्ट रोजी सायं. ६-३० वा. साजरा करण्यात आला.
या प्रसंगी 'बी' यांच्या काव्याचे अभ्यासक प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांचे भाषण झाले.
याचवेळी 'नावात काय आहे ?' या कवितेवर परिसंवाद झाला. या परिसंवादात प्रा. सुरेश म. डोळके, श्री. सुरेश देशपांडे, प्रा. या. मु. पाठक आणि डॉ. मा. गो. देशमुख यांनी भाग घेतला.

कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांचा सत्कार

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी सायं. ६-३० वा. सत्कार करण्यात आला.
या प्रसंगी प्रा. सुनील सुभेदार, श्री. त्रि. गो. देशमुख, प्रा. म. ना. लोही, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे आणि संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणे झाली.
उत्तरादाखल डॉ. वि. भि. कोलते यांचे भाषण झाले. चहा-पानानंतर हा कार्यक्रम संपला.

श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे, आचार्य अत्रे वाङ्मय दर्शन

कृतज्ञ, कर्तृत्वपूर्ण प्रतिमासंपन्न असे आचार्य अत्रे यांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करता येईल. विद्यमान मराठी लेखकात आचार्य प्र. के. अत्रे यांच्या एवढा अष्टपैलू प्रतिमावंत दुसरा कोणीही नाही. त्यांच्या इतके विविध, विपुल आणि सुरस लिखाण फारच थोड्या लेखकांनी केले आहे.
समग्र अत्रे वाङमय हे फार प्रचंड असल्यामुळे अत्रे वाङमयाचे विविध पैलू एकाच वेळी अभ्यासकांना उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विदर्भ साहित्य संघाच्या श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यास मंडळाने दि. १३ ऑगस्ट ६८ रोजी आचार्य अत्रे यांच्या ७१ व्या वाढदिनी 'अत्रे वाङ्मय दर्शन' नावाचे प्रदर्शन आयोजित केले. प्रदर्शनात आचार्यांनी लिहिलेली सर्व पुस्तके मांडण्यात आली होती. विविध पुस्तकांना अत्र्यांनी लिहिलेली महत्वपूर्ण प्रस्तावना त्याचबरोबर मराठ्यातून लिहिलेल्या महत्वाच्या अग्रलेखांची कात्रणे अभ्यासकांच्या समोर ठेवण्यात आली होती. नागपुरचे सुप्रसिद्ध छायाचित्रकार श्री. गोडबोले यांनी आपल्या संग्रहातील आचार्यांची नागपूर भेटीवर आधारलेली विविध छायाचित्रे प्रदर्शनासाठी दिली होती. प्रदर्शनाला नागपुरातील अनेक नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांनी भेट दिली. अत्रे वाङमयाचा अभ्यास करताना अभ्यासकांना उपयोगी पडेल अशी एक अत्रे वाङमय सूची विदर्भ साहित्य संघाचे अभ्यासमंडळ तयार करीत आहे.

नागपूर जिल्हा ग्रंथालयाची बैठक

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे गुरुवार दि. ६ सप्टें. ६८ रोजी सायं. ६-३० वा. नागपूर जिल्हा ग्रंथालय संघाची सभा आयोजित करण्यात आली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. राजा मंत्री उपस्थित होते. त्यांचे श्रीशिवाजी ग्रंथालयातर्फे स्वागत करण्यात आले. या भेटीचे वेळी त्यांनी श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाची पाहणी केली व कार्याविषयी समाधान व्यक्त केले. व सर्वतोपरी सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

भेट

महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक श्री. कृ. द. पुराणिक, उपसंचालक श्री. वसंतराव शव्दे यांनी दि. ९ सप्टें. रोजी श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला भेट दिली. व नवीन संकल्पित योजनांबद्दल कार्यकर्त्यांशी चर्चा केली. संस्थेच्या कार्याचे दृष्टीने सर्वतोपरी सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

दि. १३ व १४ सप्टें. रोजी कै. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वाद स्पर्धा घेण्यात आली. या वर्षी स्पर्धेची फिरती रौप्य ढाल वर्ध्याच्या जानकीदेवी बजाज महाविद्यालयाने पटकाविली. विजेत्या स्पर्धकांना अॅड. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. १०० रु. वैयक्तिक प्रथम पारितोषिक जानकीदेवी बजाज महाविद्यालयाच्या कु. माधुरी बापट हिने पटकाविले. तर ७५ रु. चे दुसरे पारितोषिक अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातील कु. नीलिमा तेलंग हिला मिळाले.

६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

कु. बापट, कु. तेलंग त्यांच्या खेरीज विश्वेश्वरय्या रिज. इंजिनिअरिंग कॉलेजच्या मोहन फाटे यांना प्रमाणपत्र मिळाले.

स्पर्धेत एकूण २८ स्पर्धकांनी भाग घेतला होता.

'भारताच्या सद्यास्थितीस अध्यक्षीय शासनपद्धती इष्ट आहे' हा या वाद स्पर्धेचा विषय होता.

नागपूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या १९ महाविद्यालयांनी वादस्पर्धेत भाग घेतला.

परीक्षक म्हणून श्री. वि. रा. काटे, श्री. रा. पु. सगदेव व श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी सहकार्य दिले.

संगीत केंद्र—

स्मृतिउत्सवाचा कार्यक्रम

सांस्कृतिक समिती अंतर्गत ' संगीत केन्द्रातर्फे ' दि. १५, १६ व १७ सप्टें. रोजी स्मृतिउत्सव साजरा करण्यात आला.

या स्मृतिउत्सव प्रसंगी वैदर्भीय कलाकारांचा अपूर्व मेळावा भरविण्यात आला.

रविवार दि. १५ सप्टें. रोजी सकाळी ९-३० वा. धनवटे रंगमंदिरात अमरावतीचे कलारसिक डॉ. मदनगोपाल यांचे हस्ते स्मृतिउत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी उद्घाटकांचे पुष्पहार घालून स्वागत केले. याचवेळी ज्येष्ठ व मान्यवर वैदर्भीय कलाकारांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

श्री. स. भ. देशपांडे (अकोला-जबलपूर) यांना डॉ. मदनगोपाल यांच्या हस्ते श्रीफळ व शाल अर्पण करण्यात आली.

श्री. दे. ज. पतकी (वर्धा) व श्री. शंकरराव देशपांडे (अमरावती) हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

या प्रसंगी श्री. स. भ. देशपांडे यांनी सत्काराप्रित्यर्थ भाषण दिले.

या नंतर सुप्रसिद्ध गायक श्री. राजाभाऊ कोगजे यांचे गायन झाले.

यावेळी आभार प्रदर्शनाचे कार्य, सांस्कृतिक समितीचे आमंत्रक श्री. जयंतराव देवबर यांनी केले.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

यानंतर स्मृतिउत्सवातील कलाकारांच्या गायन-वादनाचा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमात श्री. स. भ. देशपांडे, यांचे गायन, श्री. अरुण वकील यांचे व्हायोलिन आणि श्री. गोविंदराव दंताळे यांचे गायन झाले.

स्मृतिउत्सवातील दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १६ सप्टें. रोजी रात्रौ ९. ३० वाजता सुप्रसिद्ध गायक श्री. मधुकर गुळवणी यांचे गायन झाले. यनंतर प्रा. नंदु असनारे व प्रा. किरण देशपांडे यांचा तबला-जुगलबंदी कार्यक्रम सादर करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर कु. शकुंतला पळसोकर (अकोला) यांचे गायन व सौ. शुभदा पेंढरकर यांचे दिलरुबा-वादन झाले. यानंतर सुप्रसिद्ध गायक श्री. मधुसूदन भावे यांचे सुश्राव्य गायन झाल्यावर ही बैठक संपली.

दि. १७ सप्टें. रोजी रात्रौ ९ वाजता अंधविद्यालयातील कलाकार श्री. केशवराव ठोंबरे यांचे व्हायोलिन वादनानंतर प्रा. सौ. सुमन चौधरी यांचे गायन झाले.

यानंतर रेडिओ कलाकार श्री· धनंजय पुजारी यांचे सतारवादनाचा कार्यक्रम झाला. यावेळी अमरावतीचे सुप्रसिद्ध तबलावादक श्री. मदनसिंग पवार यांनीं तबल्याची साथ केली. यानंतर उदयोन्मुख कलाकार श्री. काळे यांचे गायन झाले.

कार्यक्रमाचे शेवटी अमरावतीचे श्री मनोहर कासलीकर यांचे सुमधुर गायन झाले.

या स्मृतिउत्सवाचे कार्यप्रमुख श्री. डॉ. बाळासाहेब पुरोहित आणि संयोजक श्री. आनंदराव जोग यांनी परिश्रम घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले.

या स्मृतिउत्सवात पेटीची साथ सर्वश्री बबनराव आठल्ये, प्रभाकर पातुरकर, पंढीनाथ कदम, अशोक मंजुळे आणि तबल्याची साथसंगत पं. संपतलाल, वसंतराव देव, शंकरराव पोपटकर, प्रल्हाद भजनी, मदनसिंग पवार, प्रभाकर देसाई, किरण देशपांडे, प्रभाकर पिल्ले यांनी केली.

या कार्यक्रमाचेवेळी कलाकारांचा परिचय करून देण्याचे कार्य श्री. प्रभाकरराव चाफेकर यांनी केले.

या स्मृतिउत्सवप्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी जें सहकार्य दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

परीक्षा समय–शनिवार दि. १२ ऑक्टोबर १९६८ पासून विभिन्न केंद्रांत परीक्षा सुरू होतील.

परीक्षार्थ्यांना सूचना–परीक्षेपूर्वी २ दिवसांचे आंत केंद्राधिकाऱ्यांकडून प्रवेश–पत्रे मिळवून स्थान व समयाची माहिती प्राप्त करून घ्यावी. याबाबत कार्यालयाकडे चोकशी करू नये.

केंद्राधिकाऱ्यांना सूचना–(१) आलेले साहित्य बरोबर आहे किंवा नाही हे तपासून पहावे व कमी–अधिकाची सूचना कार्यालयास त्वरित द्यावी. (२) परीक्षा संपताच पहिल्या डाकेने सर्व साहित्य व हिशेब कार्यालयाकडे रवाना करावेत. (३) परीक्षार्थ्यांना परीक्षेस वमविण्यास सहकार्य देणाऱ्या प्रचारकांना परीक्षेचे वेळी निरीक्षक म्हणून नियुक्त करावे. तसेच मराठी प्रवेश परीक्षेच्या मौखिक परीक्षेकरिता केंद्राधिकाऱ्यांनी आपल्या वतीने परीक्षकाची नियुक्ती करावी.

उत्तर–पत्रिका पाठविण्याविषयी सूचना

(१) संपूर्ण उत्तरपत्रिका आणि उपस्थिती कोणत्याही परिस्थितीत सोमवारी बुकपोस्टाने रवाना व्हावयास पाहिजेत

(२) आय–व्यय पत्रकाला जोडलेल्या पोस्टाने धाडलेल्या उत्तरपत्रिकांच्या पावतीवर सोमवारच्या तारखेचा पोस्टाचा शिक्का नसल्यास उत्तरपत्रिका स्वीकारल्या जाणार नाहीत व त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास केंद्रव्यवस्थापक जबाबदार राहतील. केंद्रांनी उशिरा पाठविलेल्या उत्तरपत्रिका, परीक्षा व संघ या उभयतांच्या दृष्टीने आक्षेपार्ह असतात, म्हणून ही विशेष सूचना.

(३) पोष्ट ऑफिस गाईड पार्ट १ जून १९६० नियम ११४ परिच्छेद ८, पृष्ठ ४८ ला अनुसरून "एक्सरसाईज कॉपीज" या नावाखाली उत्तरपत्रिका रजिस्टर्ड बुकपोस्टाने पाठविल्या जाऊ शकतात. आवश्यकतेनुसार वरील सवलतीचा लाभ घ्यावा.

समय पत्रिका—

परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी १९६८

शनि दि. १२ ऑक्टो. ६८ दु. २॥ ते ५॥	स्नातक १,
रवि. दि. १३ ऑक्टो. ६८ स. ७॥ ते १०॥	प्रवेश, परिचय, बोध, म. प्रबोध प्रारंभ, विनीत १, परिचित १, सा. प्रबोध, स्नातक २,
रवि. दु. २॥ ते ५॥	विनीत २, परिचित २, स्नातक ३,

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

यानंतर स्मृतिउत्सवातील कलाकारांच्या गायन-वादनाचा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमात श्री. स. भ. देशपांडे, यांचे गायन, श्री. अरुण वकील यांचे व्हायोलिन आणि श्री. गोविंदराव दंताळे यांचे गायन झाले.

स्मृतिउत्सवातील दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १६ सप्टें. रोजी रात्रौ ९. ३० वाजता सुप्रसिद्ध गायक श्री. मधुकर गुळवणी यांचे गायन झाले. यनंतर प्रा. नंदु असनारे व प्रा. किरण देशपांडे यांचा तबला-जुगलबंदी कार्यक्रम सादर करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर कु. शकुंतला पळसोकर (अकोला) यांचे गायन व सौ. शुभदा पेंढरकर यांचे दिलरुबा-वादन झाले. यानंतर सुप्रसिद्ध गायक श्री. मधुसूदन भावे यांचे सुश्राव्य गायन झाल्यावर ही बैठक संपली.

दि. १७ सप्टें. रोजी रात्रौ ९ वाजता अंधविद्यालयातील कलाकार श्री. केशवराव ठोंबरे यांचे व्हायोलिन वादनानंतर प्रा. सौ. सुमन चौधरी यांचे गायन झाले.

यानंतर रेडिओ कलाकार श्री· धनंजय पुजारी यांचे सतारवादनाचा कार्यक्रम झाला. यावेळी अमरावतीचे सुप्रसिद्ध तबलावादक श्री. मदनसिंग पवार यांनी तबल्याची साथ केली. यानंतर उदयोन्मुख कलाकार श्री. काळे यांचे गायन झाले.

कार्यक्रमाच्चे शेवटी अमरावतीचे श्री मनोहर कासलीकर यांचे सुमधुर गायन झाले.

या स्मृतिउत्सवाचे कार्यप्रमुख श्री. डॉ. बाळासाहेब पुरोहित आणि संयोजक श्री. आनंदराव जोग यांनी परिश्रम घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले.

या स्मृतिउत्सवात पेटीची साथ सर्वश्री बबनराव आठल्ये, प्रभाकर पातुरकर, पंढीनाथ कदम, अशोक मंजुळे आणि तबल्याची साथसंगत पं. संपतलाल, वसंतराव देव, शंकरराव पोपटकर, प्रल्हाद भजनी, मदनसिंग पवार, प्रभाकर देसाई, किरण देशपांडे, प्रभाकर पिल्ले यांनी केली.

या कार्यक्रमाचेवेळी कलाकारांचा परिचय करून देण्याचे कार्य श्री. प्रभाकरराव चाफेकर यांनी केले.

या स्मृतिउत्सवप्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी जें सहकार्य दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

परीक्षा समय–शनिवार दि. १२ ऑक्टोबर १९६८ पासून विभिन्न केंद्रांत परीक्षा सुरू होतील.

परीक्षार्थ्यांना सूचना–परीक्षेपूर्वी २ दिवसांचे आंत केंद्राधिकाऱ्यांकडून प्रवेश–पत्रे मिळवून स्थान व समयाची माहिती प्राप्त करून घ्यावी. याबाबत कार्यालयाकडे चौकशी करू नये.

केंद्राधिकाऱ्यांना सूचना–(१) आलेले साहित्य बरोबर आहे किंवा नाही हे तपासून पहावे व कमी–अधिकाची सूचना कार्यालयास त्वरित द्यावी. (२) परीक्षा संपताच पहिल्या डाकेने सर्व साहित्य व हिशेब कार्यालयाकडे रवाना करावेत. (३) परीक्षार्थ्यांना परीक्षेस बसविण्यास सहकार्य देणाऱ्या प्रचारकांना परीक्षेचे वेळी निरीक्षक म्हणून नियुक्त करावे. तसेच मराठी प्रवेश परीक्षेच्या मौखिक परीक्षेकरिता केंद्राधिकाऱ्यांनी आपल्या वतीने परीक्षकाची नियुक्ती करावी.

उत्तर–पत्रिका पाठविण्याविषयी सूचना

(१) संपूर्ण उत्तरपत्रिका आणि उपस्थिती कोणत्याही परिस्थितीत सोमवारी बुकपोस्टाने रवाना व्हावयास पाहिजेत.

(२) आय–व्यय पत्रकाला जोडलेल्या पोस्टाने धाडलेल्या उत्तरपत्रिकांच्या पावतीवर सोमवारच्या तारखेचा पोस्टाचा शिक्का नसल्यास उत्तरपत्रिका स्वीकारल्या जाणार नाहीत व त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास केंद्रव्ययस्थापक जबाबदार राहतील. केंद्रांनी उशिरा पाठविलेल्या उत्तरपत्रिका, परीक्षा व संघ या उभयतांच्या दृष्टीने आक्षेपार्ह असतात, म्हणून ही विशेष सूचना.

(३) पोष्ट ऑफिस गाईड पार्ट १ जून १९६० नियम ११४ परिच्छेद ८, पृष्ठ ४८ ला अनुसरून "एक्सरसाईज कॉपीज" या नावाखाली उत्तरपत्रिका रजिस्टर्ड बुकपोस्टाने पाठविल्या जाऊ शकतात. आवश्यकतेनुसार वरील सवलतीचा लाभ घ्यावा.

समय पत्रिका—

परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी १९६८

शनि दि. १२ ऑक्टो. ६८ दु. २॥ ते ५॥ स्नातक १,

रवि. दि. १३ ऑक्टो. ६८ स. ७॥ ते १०॥ प्रवेश, परिचय, बोध, म. प्रबोध प्रारंभ,
विनीत १, परिचित १, सा. प्रबोध, स्नातक २,

रवि. दु. २॥ ते ५॥ विनीत २, परिचित २, स्नातक ३,

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

Regd. No. MH 1174

'युगवाणी' दिवाळी अंक

'युगवाणी'चा नोव्हेंबरचा अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल. दिवाळीच्या दिवसापर्यंत हा विशेषांक वाचकांच्या हाती पडावा अशा बेताने तो टपालात टाकला जाईल.

या विशेषांकासाठी जाहीर केलेल्या कथा–कविता स्पर्धेसाठी आलेल्या साहित्यांपैकी पारितोषिकपात्र व इतर निवडक कथा व कविता या विशेषांकात प्रसिद्ध होतील.

या विशेषांकाच्या प्रती वि. सा. संघाच्या सदस्यांना व इतर वर्गणीदारांना त्यांच्या वर्गणीत मिळतील. दिनांक ५ ऑक्टोबरपर्यंत वि. सा. संघाचे सदस्य व 'युगवाणी'चे वर्गणीदार होणाऱ्यांना हा विशेषांक त्यांच्या चालू सालच्या वर्गणीतच मिळेल. फक्त विशेषांक हवा असणाऱ्यांनी दीड रुपया वि. सा. संघाच्या कार्यालयात जमा करावा किंवा मनिऑर्डरने पाठवावा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ